# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ / आषाढ २७, १९४५ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(३) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**
**(४) उद्योग मंत्री**
**(५) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(६) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**
**(७) अन्न व औषध प्रशासन मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६१**

---

### अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीची दुरुस्ती व सुशोभिकरणाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) * १९७०४ श्री.जयंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग जिल्हा रुग्णालयाची जीर्ण झालेली इमारत पाडून नवीन इमारत बांधावी असा अहवाल शासनाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेने दिलेला असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने गत दहा वर्षांपासून दुरुस्ती आणि सुशोभिकरणाच्या नावाखाली १२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दहा वर्षात इमारतीची दुरुस्ती व सुशोभिकरण करुनही सद्य:स्थितीमध्ये इमारत कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता असून सदर इमारत पाडून त्या ठिकाणी सहा मजल्यांच्या नवीन इमारतीचे बांधकाम करावे, अशी मागणी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी आरोग्य उपसंचालक व जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे करुन पर्यायी व्यवस्थाही सुचविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आंतर रुग्ण विभागाची सन १९८०-८१ मध्ये बांधलेली इमारत धोकादायक झाल्यामुळे नवीन इमारत बांधण्याची सूचना आरोग्य विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागास करुनही त्याबाबतचा अहवाल प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेने दहा वर्षांपूर्वी देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाने या अहवालाकडे दुर्लक्ष केले, सन २०१२ मध्ये नव्याने

स्ट्रक्चरल ऑडिट करून या इमारतीची परिस्थिती बिकट असली तरी व्यापक दुरुस्ती शक्य असल्याचा खोटा अहवाल खाजगी संस्थेकडून तयार करून घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेने दिलेल्या अहवालाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, अलिबाग इमारतीचे बांधकाम सन १९८०-८१ मध्ये करण्यात आले आहे. सदर रुग्णालयातील आंतररुग्ण इमारत व व आर.सी.सी रॅम्पचे संरचनात्मक परिक्षण डॉ.बाबासाहेब आंबेडकर, टेक्नोलॉजिकल युनिव्हर्सिटी (BATU) लोणेरे या संस्थेमार्फत माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये करण्यात आले. संरचनात्मक परिक्षण अहवालामध्ये आंतररुग्ण इमारतीचे स्ट्रक्चरल बळकटीकरण व आर.सी.सी. रॅम्पची पुनर्बांधणी करण्याबाबत सूचना देण्यात आली. त्यास अनुसरुन आंतररुग्ण इमारतीचे स्ट्रक्चरल बळकटीकरण व आर.सी.सी. रॅम्पच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा रुग्णालय, अलिबाग इमारतीचे संरचनात्मक परिक्षण वीरमाता जिजाबाई टेक्नोलॉजीकल इन्स्टिटयुट (VJTI) या संस्थेमार्फत माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी करुन घेण्यात आले आहे. संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार सदर इमारत सी २ ए प्रवर्गात येत असून इमारत रिकामी करुन संरचनात्मक दुरुस्ती करण्यास योग्य आहे. त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इमारतीतील कक्षांचे योग्य नियोजन करुन दुरुस्तीकरीता कक्ष रिकामे करुन देण्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय, रायगड अलिबाग यांना कळविण्यात आले आहे. तथापि, जिल्हा शल्य चिकित्सक रायगड-अलिबाग यांनी दिनांक ३१/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे आंतररुग्ण इमारतीतील कामकाजाचे स्थालांतरण अन्य इमारतींमध्ये प्रस्तावित करुन सदर इमारतीची दुरुस्ती/डागडूजी न करता जुनी इमारत पाडून त्याठिकाणी G+६ च्या इमारतीची मागणी केली आहे. याबाबत आरोग्य विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(३) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा रुग्णालय, अलिबाग इमारतीचे संरचनात्मक परिक्षण वीरमाता जिजाबाई टेक्नोलॉजीकल इन्स्टिटयुट (VJTI) या संस्थेमार्फत माहे फेब्रुवारी २०२३ रोजी करुन घेण्यात आले आहे. संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार सदर इमारत सी २ ए प्रवर्गात येत असून इमारत रिकामी करुन संरचनात्मक दुरुस्ती करण्यास योग्य आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ करिताच्या संच मान्यतेच्या प्रक्रियेत राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अवैध असल्याचे आढळून आल्याबाबत

**(२) * १९४०१ श्री.किरण सरनाईक, श्री.अरुण लाड, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.कपिल पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी संच मान्यतेची प्रक्रिया सुरू केली असून त्यासाठी सर्व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड पडताळणीची प्रक्रिया सुरू असून त्यानुसार राज्यातील १ कोटी ९९ लाख विद्यार्थ्यांचे आधारकार्ड युआयएडीआयने तपासले असता, १ कोटी ६८ लाख विद्यार्थांचे आधारकार्ड वैध आढळले तर शिक्षण विभागाचे नियमानुसार २४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांचे आधारकार्ड वैध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या संच मान्यतेच्या आदेशाप्रमाणे सरल प्रणालीत सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नोंदवून घेऊन आधार संलग्नित विद्यार्थी संख्याच गृहीत धरून संच मान्यता करण्याचे निर्देश दिले असून, अनेक शाळांच्या ऑनलाईन संच मान्यतांमध्ये गेल्या ५ ते ६ वर्षांपासून मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्या आहेत व त्यामुळे विद्यार्थी संख्या असताना व त्यांची ऑनलाईन नोंदणी झाली असताना देखील शिक्षकांची पदे संच मान्यतेमध्ये दर्शविली नसल्यामुळे बरेच शिक्षक कृत्रिमरित्या अतिरिक्त ठरत असल्याचे निदर्शनास आले असून, याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ व इतरही शिक्षक संघटनांनी सन २०२२ - २३ च्या संच मान्यतेसंदर्भात निवेदन सादर करून दिलेली संच मान्यता ही मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील नियमामुळे आधारकार्ड वैध नसलेले २४ लाख ६० हजार विद्यार्थी शाळाबाहय ठरवून ६० हजार शिक्षक अतिरिक्त होण्याची शक्यता असून याबाबत राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे सर्व कार्यवाहक व परभणी येथील माजी लोकप्रतिनिधी यांनी सन २०२३ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदन सादर केले असून, ज्या शाळा २० टक्के अनुदानाकरीता पात्र आहेत किंवा अंशत: अनुदानित आहेत अशा शाळेतील शिक्षक चुकीच्या संच मान्यतेमुळे वेतनापासून वंचित राहत आहेत व त्यांना सेवा संरक्षण नसल्यामुळे त्यांच्या सेवा समाप्त होत असून, सन २०१५ मध्ये शिक्षण हक्क कायद्यामधील तरतुदींचा चुकीचा निर्णय घेवून १७,००० शिक्षक अतिरिक्त करण्यात आले होते, त्यांचे समायोजन अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार शाळा प्रवेशासाठी आधार कार्ड अनिवार्य करून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवता येणार नाही हे स्पष्ट केलेले असून सुध्दा महाराष्ट्र शिक्षण हक्क कायदा व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे शिक्षण विभाग उल्लंघन करीत असून, स्टुडंट पोर्टलवर विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अपलोड करणे व आधार वैधता

करण्यासाठी दिनांक ३० एप्रिल ही मुदत होती, परंतु ८ मे पर्यंतच्या पोर्टलवरील आकडेवारीनुसार ४४ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या वेबसाईट सुरू न होणे, स्पेलींगमध्ये चूक झाल्यास अडथळा येणे, परराज्यातील आधार कार्डचे व्हॅलिडेशन न होणे इ. कामासाठी शिक्षण संचालनालयामार्फत १५ मे पर्यंत राज्यातील सर्व शिक्षकांच्या शाळानिहाय संच मान्यता निश्चित केल्या जाणार आहेत, तत्पुर्वी या ४४ लाख विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची अपलोडिंग व वैधता पूर्ण न झाल्यास हजारो शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात येणार असून, ज्या शाळांच्या ८० टक्के विद्यार्थ्यांचे आधार वैधता झाले आहे, त्यांचे वेतन बंद करू नये याबाबत अनेक संघटना व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, नव्याने अनुदानावर येणाऱ्या शाळा-महाविद्यालयांना वेतन अनुदानासाठी संच मान्यता आवश्यक असून शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ ज्या विद्यार्थ्यांना दिला जातो, त्यांचे आधारकार्ड अद्ययावत करणे बंधनकारक आहे, आधारकार्ड अद्ययावत न करणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे अनुदान मिळणार नसल्याचे सांगण्यात येत आहे, अनुदानास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, शालेय पोषण आहार तसेच मोफत पाठपुस्तके आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळू शकतो त्यामुळे आधार पडताळणी आवश्यक बाब आहे असाही शिक्षण विभागाकडून दावा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, २० मे अखेर तब्बल ४८ हजार शाळांची अंतरिम संच मान्यता प्रलंबित असून ५६ हजार ४८९ शाळांची अंतरिम संच मान्यता झाली आहे तसेच सन २०२२-२०२३ च्या संच मान्यता प्रलंबित असल्यामुळे शिक्षक भरती लांबणीवर पडणार असल्याने संच मान्यतेत विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्याची मागणी शिक्षक भारती आणि विविध संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने माध्यमिक शाळांच्या संच मान्यता, कनिष्ठ महाविद्यालयाच्या संच मान्यतेप्रमाणे ऑफलाईन करण्याबाबत निर्णय घेणे, तसेच आधार कार्ड पडताळणीनुसार संच मान्यता अंतिम करण्याचे सरकारचे धोरण तसेच सरल पोर्टलवर त्रुटी दुर करण्याबाबत व शिक्षकांवर अन्याय होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) राज्यातील एकूण २,११,४४,४६७ विद्यार्थ्यांपैकी १,९३,४५,१११ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड वैध आढळले आहेत. उर्वरित १७,९९,३५६ विद्यार्थ्यांपैकी ३,०८,८११ विद्यार्थ्यांनी अद्याप आधार क्रमांक घेतलेले नाहीत. तर १४,९०,५४५ विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक वैध ठरलेले नाहीत.

(२) अशा स्वरुपाची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) सन २०२२-२३ च्या संच मान्यता करण्यासाठी विद्यार्थ्याचे आधार क्रमांक वैध करण्यासाठी शाळांना अद्यापपर्यंत सवलत दिलेली आहे. दिनांक ३०/११/२०२२ रोजी शाळेच्या पटावर नोंद असलेले विद्याथी वैध करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याकरीता प्रत्येक जिल्ह्यामध्ये आधार नोंदणी करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच ज्या विद्यार्थ्याचे आधार क्रमांक नाहीत अशा विद्यार्थ्यांची पडताळणी करुन असे विद्यार्थी संच मान्यतेकरीता ग्राह्य धरण्यासाठी संचालनालयाच्या वतीने दिनांक ०७/०६/२०२३ अन्वये आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. ज्या शाळांच्या संच

मान्यतेमध्ये त्रुटी आहेत अशा शाळांच्या संच मान्यता सुधारित करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे, त्यामुळे कृत्रिमरित्या अतिरिक्त शिक्षक होण्याची शक्यता नाही.

(४), (५), (६) व (७) सरल संकेतस्थळावर आधार नोंदणी करताना सद्य:स्थितीत कोणत्याही तांत्रिक अडचणी येत नाहीत. वित्त विभागाच्या दिनांक ०८/०६/२०२२ व शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ३०/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार विविध शैक्षणिक सवलती व वैयक्तीक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी आधार कार्ड बंधनकारक करण्यात आलेले आहे. आधार क्रमांक वैध असलेले विद्यार्थी व संचालनालयाचे पत्र दिनांक ०७/०६/२०२३ अन्वये पडताळणीअंती वैध ठरलेले विद्यार्थी गृहीत धरून अंतिम संचमान्यता देण्याचे नियोजित आहे.

सद्य:स्थितीत ९१.४९ विद्यार्थ्यांचे आधार पडताळणीचे काम पूर्ण झाले असून उर्वरित विद्यार्थ्यांचे आधार पडताळणीचे काम सुरु आहे.

विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक नसणे / आधार पडताळणी पूर्ण झालेली नसणे या कारणास्तव विद्यार्थ्यांचे प्रवेश नाकारण्यात आलेले नाहीत / शाळाबाहय ठरविण्यात आलेले नाहीत व संबंधित विद्यार्थ्यांना वैयक्तीक लाभाच्या योजनांपासून वंचित ठेवण्यात आलेले नाही. विभागाच्या दिनांक ०६/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार नव्याने अनुदानावर येणाऱ्या शाळा- महाविद्यालयांना सन २०२२-२३ च्या संच मान्यता तपासून वेतन अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शाळांना प्रचलित धोरणानुसार अनुदान देणेबाबत

**(३) * १९८१९ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सत्यजीत तांबे, श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १७७०६ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कायम शब्द वगळलेल्या अघोषित सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग तुकड्यांना अनुदानासाठी घोषित करुन त्यावरील शिक्षक - कर्मचाऱ्यांना वेतन देण्याचा तसेच २०% व ४० % अनुदान घेत असलेल्या शाळांना पुढील टप्पा अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार अनुदान वितरणाच्या झालेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व शाळांना प्रचलित धोरणानुसार १०० % अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) कायम शब्द वगळलेल्या पात्र अघोषित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यामधील पात्र तुकड्या व त्यावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान अदा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) कायम शब्द वगळलेल्या अघोषित पात्र शाळा / वर्ग तुकड्यांना अनुदान पात्र घोषित करुन अनुदान अदा करण्याबाबत शासन निर्णय, दिनांक ६/२/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला असून, सदर शासन निर्णयातील विहीत अटी व शर्तींची पुर्तता करुन निधी अदा करण्याचे निर्देश आहेत. तसेच, सदर शासन निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासन परिपत्रक, दिनांक २४/४/२०२३ अन्वये कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त, दिनांक ६/२/२०२३ च्या शासन निर्णयानुसार, अनुदान पात्र अघोषित शाळांना २० टक्के अनुदान व यापूर्वी २० टक्के अथवा ४० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उच्चस्तरीय चौकशी समितीच्या अहवालाबाबत

**(४) * १९४६७ श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १७१४३ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल उशिरा लावणे तसेच अन्य अनियमित कामांबद्दल एम.के.सी.एल. या कंपनीची चौकशी करण्याबाबत विधीमंडळचे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन मार्च, २०२२ मध्ये मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांनी आदेशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी सुरू असतानादेखील विद्यापीठाची अन्य कामे एम.के.सी.एल. कंपनीस देण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोषी कंपनीस वारंवार विविध कामे दिल्याबाबत मा.+लोकप्रतिनिधी यांनी लेखी तक्रार व निवेदने दिल्यानुसार मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी उच्चस्तरीय चौकशी समितीद्वारे चौकशी करण्याचे आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीने दिलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने कुलपती म्हणून आवश्यक ती कारवाई करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांकडे प्रकरण सादर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल उशिरा लावणे तसेच अन्य अनियमित कामाकाजाबाबत चौकशी करण्यासाठी शासनस्तरावरुन चौकशी समिती गठीत करण्यात

आली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांना संबंधितावर कारवाई करण्याचे तसेच सदर प्रकरणी खुलासा सादर करण्याचे कळविण्यात आले होते. कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने कुलपती म्हणून आवश्यक ती कारवाई करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांकडे प्रकरण सादर केलेले आहे. चौकशी समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवणे अपेक्षित नसल्याने त्यासंदर्भात कार्यवाही करण्यात आली नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करणेबाबत

**(५) * १९३३६ श्री.कपिल पाटील, श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सत्यजीत तांबे, श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक १२२६८ ला दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना देण्यात येणारी वैद्यकीय देयक प्रतिपूर्ती ऐवजी सावित्री फातिमा कुटुंब आरोग्य कॅशलेस योजना लागू करण्याबाबत मा.तत्कालीन शिक्षण मंत्री यांनी सभागृहात आश्वासित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके देत असताना अनेक वेळा ती फाईल तयार करणे, हॉस्पिटलमधून त्याची मंजुरी घेणे आणि पुन्हा शिक्षण विभागाकडे पाठवणे यामध्ये अनेकदा गैरव्यवहार होतात. तसेच दोन दोन वर्षे पैसे नसल्याचे कारण सांगून वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके व अन्य देयके मिळाली नसल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील देयके थकल्याने कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यात असंतोषाची भावना निर्माण झाली आहे व ही देयके त्वरित आदा करण्याची मागणी वेगवेगळ्या संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने थकित वैद्यकीय देयक व अन्य देयके अदा करण्याबाबत निधीची तरतूद करणे तसेच वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना कॅशलेस करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) थकित वैद्यकीय देयके तसेच अन्य देयके अदा करण्याकरीता पुनर्विनियोजनव्दारे, पूरक मागणीव्दारे निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

कॅशलेस आरोग्य योजना शिक्षकांना तात्काळ लागू करण्याबाबत तत्कालिन मा.मंत्री शालेय शिक्षण यांनी विधानमंडळासमोर आश्वासित केले होते. तथापि, त्याअनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावास सार्वजनिक आरोग्य विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने असहमती दर्शवली आहे. तसेच राज्य शासकीय अधिकारी-कर्मचारी यांनाही अद्याप कॅशलेस सुविधा अनुज्ञेय नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील औषध विक्रेत्यांचे परवाने निलंबित अथवा रद्द करण्याच्या प्रकरणांमध्ये गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(६) * १९७५७ ॲड.अनिल परब, श्री.आमश्या पाडवी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औषधविक्रेत्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित असतानाही राज्याच्या विद्यमान अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे तसेच अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांच्या कार्यालयातील स्वीय सहायक, खाजगी सचिव व विशेष कार्य अधिकारी यांनी मंत्री महोदयांकडील प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेबाबत औषध विक्रेत्यांकडून बेकायदा व अवास्तव रकमांची मागणी करीत असल्याच्या तक्रारी ‘महाराष्ट्र स्टेट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट्स असोसिएशन’ या औषध विक्रेत्या संघटनेकडून मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे माहे मे, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत अनेक लहानसहान त्रुटींसाठी औषधविक्रेत्यांचे परवाने निलंबित करणे किंवा कायमस्वरूपी रद्द करणे अशा प्रकरणांवर याचिका करूनही शासनाकडून सुनावणी घेण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने व काही राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाकडे केली असून उक्त प्रकरणी कारवाई न झाल्यास, त्याविरोधात राज्यभर आंदोलन करण्याचा व वेळप्रसंगी बंद पुकारण्याचा इशारा संघटनेने शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी भ्रष्टाचार करून औषधविक्रेत्यांची पिळवणूक करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे आहे.

द महाराष्ट्र स्टेट केमिस्टस् ॲण्ड ड्रगिस्टस् असोसिएशन, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १८/०४/२०२३ च्या निवेदनान्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

(२) हे खरे नाही.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ मधील तरतुदीनुसार केल्या

जाणाऱ्या नियमित तपासण्यांमध्ये आढळलेल्या दोषांचे गांभीर्य विचारात घेऊन संबंधित परवानाधारकांचे परवाने कमी-जास्त कालावधीसाठी निलंबित अथवा रद्द करण्याची कारवाई करण्यात येते. त्याचप्रमाणे, कारवाई करण्यात आलेल्या व शासनाकडे अपीलात आलेल्या सर्व परवानाधारकांच्या अपिलांवर वेळोवेळी सुनावण्या घेऊन अपिले निकाली काढली जातात.

(३) हे अंशत: खरे आहे.

द महाराष्ट्र स्टेट केमिस्टस् ॲण्ड ड्रगिस्टस् असोसिएशन, मुंबई यांनी दिनांक १८/०४/२०२३ च्या निवेदनान्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रार केली असून सदर तक्रारीमध्ये राज्यभर आंदोलन करण्याचा व बंद पुकारण्याचा इशारा दिला आहे. तथापि, गुन्हे शाखेमार्फत चौकशी करण्यात यावी, असे निवेदनात नमूद केले नाही.

(४) याप्रकरणी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०५/२०२३ रोजी द महाराष्ट्र स्टेट केमिस्टस ॲण्ड ड्रगिस्टस् असोसिएशन, मुंबई यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिमलगट्टा (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथील इंद्रावती नदीवर पूल बांधण्याबाबत

**(७) * १९३७८ श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिमलगट्टा (ता.अहेरी, जि.गडचिरोली) पासून २० कि.मी. अंतरावरील इंद्रावती नदीवर पूल नसल्याने बि-हाडघाट येथील गावकऱ्यांना सुमारे १५० कि.मी. दूर अंतरावरुन पातागुडम पुलावरुन प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील गावकऱ्यांना डोग्यातून प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने सदर इंद्रावती नदीवर पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील बिऱ्हाडघाट हे गांव अहेरी तालुक्यात इंद्रावती नदीच्या किनाऱ्यावर वनक्षेत्रात वसलेले आहे. तेथील गावकऱ्यांना छत्तीसगड राज्यात प्रवास करण्याकरीता पातागुडम गावाजवळील इंद्रावती नदीवरील मोठ्या पूलावरुन जावे लागते. बिऱ्हाडघाट ते पातागुडम पर्यंतचे अंतर ४८.७८० कि.मी. आहे.

(२) होय, बिऱ्हाडघाट हे गांव अहेरी तालुक्यात इंद्रावती नदीच्या किनाऱ्यावर वसले असल्याने गावातील गावकऱ्यांना लगतच्या छत्तीसगड राज्यात जाणेकरीता डोंग्यातून प्रवास करावा लागतो.

(३) व (४) पुलाचे बांधकाम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## राज्यातील कार्यरत तसेच सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हफ्ते तसेच सेवानिवृत्तीच्या रकमा अदा करणेबाबत

**(८) * १८९५४ श्री.सुरेश धस, श्री.कपिल पाटील, श्री.किरण सरनाईक, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश जिल्हयांमधील स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या थकबाकीचा फक्त पहिला हप्ता जमा झाला असून काही ठिकाणी दुसरा हप्ता मिळाला आहे तर इतर शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना दुसरा, तिसरा आणि चौथा हप्ता मिळाला असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या तिसरा व चौथा हप्ता देण्यासंदर्भात दिनांक ९ मे, २०२२ व २४ मे, २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असताना सुद्धा सदर दोन्ही हफ्ते देणे प्रलंबित असल्याचे माहे जून,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्ती उपदान, अंशराशीकरण, सातव्या वेतन आयोगाचा दुसरा व तिसरा हप्ता तसेच इतर रकमा माहे एप्रिल, २०२१ पासून प्रलंबित असून प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांनाही दुसरा, तिसरा आणि चौथा हप्ता जमा करण्याबाबत शिक्षक भारती व अन्य शिक्षक संघटनांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधीअभावी सेवानिवृत्त शिक्षकांना त्यांच्या प्रलंबित रकमा मिळत नसल्याने सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्ती उपदान, अंशराशीकरण, सातव्या वेतन आयोगाचा दुसरा व तिसरा हप्ता तसेच प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतनाची थकबाकी व माहे एप्रिल, २०२१ पासून प्रलंबित असलेल्या रकमा तात्काळ सेवानिवृत्त शिक्षकांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

(२) अशा प्रकारची निवेदने प्राप्त होत आहेत.

(३) कोविड-१९ महामारीमुळे मागील काही वर्षात अपुरे अनुदान उपलब्धतेमुळे राज्यभरातील शिक्षकांना अंशराशीकरण /उपदान तसेच सातव्या वेतन आयोगाच्या हप्त्याची रक्कम प्रदान करता आलेली नाही.

(४) राज्यभरातील शिक्षकांना सदर रक्कम प्रदान करण्याकरीता अतिरिक्त अनुदानाची आवश्यकता आहे. सदर अतिरिक्त अनुदानाची मागणी पुरवणी मागणीद्वारे करण्यात आली असून निधी उपलब्धतेनुसार सेवानिवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्ती उपदान, अंशराशीकरण, सातव्या वेतन आयोगाचा दुसरा व तिसरा हप्ता तसेच इतर प्रलंबित असलेल्या रकमा प्राधान्याने अदा करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्वस्त धान्य दुकानदार, केरोसिन परवानाधारक दुकानदार व शिधापत्रिकाधारकांच्या विविध मागण्या व अडचणींबाबत

**(९) * १८८१९ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना सन २०१५ पासून केरोसीन वाटप बंद करण्यात आले असल्याने तेथील शिधापत्रिकाधारकांना जादा भावाने बाजारातून केरोसीन विकत घ्यावे लागत आहे, त्याचप्रमाणे केरोसीन परवानाधारक दुकानदारांची दुकाने बंद पडल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची परिस्थिती उद्‌भवली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी सन २०२१ व २०२२ तसेच जानेवारी व फेब्रुवारी, २०२३ मध्ये शिधापत्रिकाधारकांना शासनाच्या योजनेनुसार मोफत धान्याचे वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कालावधीतील धान्य वाटपाचे कमिशनही अद्याप स्वस्त धान्य दुकानदारांना देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्वस्त धान्य दुकानदारांना त्यांचे कमिशन त्वरीत देण्याबाबत तसेच केरोसीन परवानाधारक दुकानदारांची बंद पडलेली दुकाने नव्याने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) सातारा जिल्ह्यास डिसेंबर, २०२२ पर्यंत मागणीच्या १००% केरोसिन नियतन मंजूर करण्यात आले आहे. गॅस जोडणीधारकांना केरोसिन मधून वगळण्यात आल्याने सातारा जिल्ह्याची सन २०२३ पासून केरोसिनची मागणी निरंक आहे. मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिनांक ०७/०१/२०१६ रोजी अनुदानित दराचे केरोसिन केवळ बिगरगॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांनाच देण्याचे आदेश शासनास दिले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनुदानित केरोसिन केवळ बिगरगॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांनाच प्राप्त व्हावे यास्तव शासन परिपत्रक दिनांक ०१/०८/२०१८ अन्वये गॅसजोडणी नसल्याबाबतचे हमीपत्र सादर करणाऱ्या बिगर गॅसधारक शिधापत्रिकाधारकांकरिता शासनाकडून केरोसिन नियतन मंजूर करण्यात येते.
(२) सन २०२१ व २०२२ मध्ये PMGKY योजनेंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्याचे वाटप करण्यात आले आहे. तसेच जानेवारी, २०२३ पासून NFSA राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत मोफत धान्य वितरित केले आहे.
(३) जिल्हा पुरवठा कार्यालय, सातारा यांच्या कार्यालयामार्फत सन २०२१ व २०२२ या वर्षातील प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेच्या धान्य वाटपाचे सर्व कमिशन रास्तभाव दुकानदारांच्या खाती जमा करण्यात आलेले आहे. तसेच NFSA योजनेंतर्गत स्वस्तधान्य दुकानदारांना जानेवारी, २०२३ ते फेब्रुवारी, २०२३ या कालावधीतील कमिशनची एकूण रक्कम रुपये ३,६२,८८,२९१/- अदा करण्याबाबत मंजुरी देण्यात आली असून तालुकानिहाय रास्तभाव दुकानदारांच्या खाती जमा करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) राज्यातील केरोसिन परवानाधारक व रास्तभाव दुकानदार यांना पर्यायी रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी फ्रीसेल केरोसिन तसेच ५ कि.ग्रॅम चे लहान सिलिंडर वितरण करण्यास दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यातील घाऊक केरोसिन परवानाधारकांना नवीन पेट्रोल पंप घेण्याकरीता अर्ज करण्याची संधी देण्याबाबतचा निर्णय दिनांक १०/१२/२०१८ रोजी घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू येथील रिफायनरी प्रकल्पाबाबत

**(१०) * १९१११२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अंबादास दानवे, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १७२२० ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारसू (जि.रत्नागिरी) येथे रिफायनरी प्रकल्प (हरित तेल शुध्दीकरण) उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, सदर निर्णयाच्या विरोधात प्राचीन वारसा असलेली काताळ शिल्पे आणि कोकणातील पर्यावरण धोक्यात येणार असल्याच्या तक्रारी पर्यावरण तसेच प्राचीन वारसा क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनी व कार्यकर्त्यांनी केल्या असून, स्थानिक नागरिकांनीही या प्रकल्पास विरोध करुन आंदोलन केल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक नागरिकांचा व शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला होत असलेला विरोध डावलून संचारबंदी लागू करुन निदर्शने करणाऱ्या नागरिकांवर लाठीचार्ज करण्यात आला असून, घटनास्थळी वार्तांकन करत असलेल्या माध्यमांच्या प्रतिनिधींनाही पोलिसांनी जबरदस्तीने हुसकावून लावले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक नागरिकांचा विरोध डावलून दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी माती परिक्षणासाठी ड्रिलिंगच्या कामास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी उक्त प्रकरणाची चौकशी करुन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना पत्राद्वारे कारवाई करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कोकणातील निसर्ग सौंदर्य, पर्यावरण, संरक्षित घाट आणि प्राचीन वारसा यांचे संरक्षण होईल असे पर्यावरण पूरक उद्योग व विकासाचे प्रकल्प आणण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बारसू रिफायनरी विरोधात स्थानिकांची भुमिका जाणून घेणे तसेच शासनाची प्रकल्पाबाबतची भुमिका व या प्रकल्पास स्थानिकांचा विरोध असल्याने प्रकल्प दुसरीकडे नेण्याबाबत तसेच पोलीस महासंचालकांकडे केलेल्या कारवाईच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, अंशत: हे खरे आहे.

(२) जिल्हा प्रशासनाकडून जमावबंदी आदेश लागू करण्यात आले होते. परंतु, नागरिकांवर लाठीचार्ज करण्यात आलेला नाही. पत्रकारांना हुसकावून लावण्यात आले नाही.

(३) मे. रत्नागिरी रिफायनरी व पेट्रोकेमिकल कंपनीकडून दिनांक २४/०४/२०२३ ते १२/०५/२०२३ या कालावधीत राजापूर तालुक्यातील बारसू परिसरात माती परीक्षणाचे (ड्रिलिंगचे) कामकाज करण्यात आले, हे खरे आहे.

(४) विवेचन नाही.

(५) मे. रत्नागिरी रिफायनरी पेट्रोकेमिकल लिमिटेड यांचे मार्फत पर्यावरण व निसर्ग संरक्षणासाठी पुढील बाबींची उपाययोजना करण्याचे योजले आहे.

• शुन्य द्रव उत्सर्जन (Zero Liquid Discharge)

• ऊर्जा बचत आणि पुनर्वापर प्रक्रिया-कार्बन उत्सर्जन कमीत कमी असणारे जागतिक दर्जाचे ऊर्जा वापर तंत्रज्ञानाचा वापर करणार.

• वायू उत्सर्जन करताना ऑनलाईन तपासणी यंत्रणा.

• कमी कार्बन उत्सर्जन असणाऱ्या इंधनाचा वापर करणार.

• शक्यतो हरित हायड्रोजन आणि अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत वापरण्याचा प्रयत्न केला जाईल.

• ३३ टक्के जमीन हरित पट्टा विकसित करणार ८० टक्के तेलाचे वाहन जमिनीखालील पाईपलाईनव्दारे करणार.

वरील सर्व बाबींची पूर्तता करून पर्यावरणपुरक प्रकल्प करण्याचे नियोजित आहे.

(६) दिनांक २७/०४/२०२३ रोजी रिफायनरी समर्थक व रिफायनरी विरोधक यांची पर्यावरण तज्ञासोबत बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये रत्नागिरी रिफायनरी पेट्रोकेमिकल लिमिटेड कंपनीबाबत शंका, तक्रारी तसेच पर्यावरण विषयक गैरसमज यांवर तज्ञ व्यक्तींकडून प्रश्न उत्तर स्वरूपात चर्चा करून निरसन करण्यात आले.

सदर प्रकल्पाकरिता बारसु ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथे क्षेत्र उपलब्ध असल्याबाबत केंद्र शासनास दिनांक १२/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(११)** * **१९०२७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक ३ मे, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्याच्या गुणवत्तापूर्ण वेगवान देखभाल दुरुस्तीसाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला असून सदरहू महामंडळ स्थापन केल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांची गुणवत्ता, देखभाल व दुरुस्ती वेळेत होईल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच सदरहू महामंडळ स्थापन करण्याची सर्वसाधारण करणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू महामंडळ स्थापन करण्याच्या दृष्टीने तसेच रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे. शासन निर्णय क्रमांक –संकीर्ण २०२०/प्र.क्र.१०७/ नियोजन-१अ, दिनांक २२/०५/२३ अन्वये "महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ" स्थापन करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) या मंडळामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील तालुका व तालुका जोडणारे रस्ते, जास्त वाहतूक वर्दळ असलेल्या किंवा पर्यटन स्थळांना जोडणाऱ्या प्रमुख राज्यमार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग यामधून तसेच विविध योजनांमधून रस्ते सुधारणा करण्यात आलेल्या रस्त्यांची वाहतूक वर्दळ विचारात घेऊन प्रकल्पामध्ये निवड करण्यात येईल.

सार्वजनिक खाजगी भागीदारीची कामे राबविण्यासाठी सदर महामंडळ मुख्यत्वेकरुन इतर राज्यात काम करेल आणि शासन ते शासन जमा योगदान प्रकल्पांसाठी काम करेल. रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ. २२ पायाभूत सुविधा विकास क्षेत्रांतील प्रकल्प राबविण्यासाठी व त्यासाठी निधी उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याअंतर्गत शासकीय मालकीच्या नवीन महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.
(३) व (४) महामंडळ स्थापन करण्याच्या दृष्टीने येणाऱ्या खर्चाची तरतूद करणे, संचालक मंडळाची नियुक्ती करणे, महामंडळ मुख्यालय उपलब्ध करणे इ. तद्नुषंगिक विषयक कार्यवाही प्रगतीत आहे.

महामंडळाची औपचारिकरित्या नोंदणी झाल्यानंतर त्याचे कामकाजास सुरुवात करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये पोषण आहार नियमित मिळत नसल्याबाबत

**(१२) * १९१६१ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १७७०२ ला दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळांमधील ८ वी पर्यंतचे ८८ लाखांहून अधिक विद्यार्थी पोषण आहार नियमित मिळत नसल्याने शालेय पोषण आहारापासून वंचित असल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोषण आहाराचा पुरवठा मागील दोन महिन्यांपासून बंद असल्याने शाळांमध्ये खिचडी शिजविण्यात आलेली नाही त्यामुळे गोरगरीब मुलांना उपाशी रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोषण आहाराची निविदा प्रक्रिया तातडीने राबवून सदरील शाळांमध्ये पोषण आहार सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२३-२५ या कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया माहे मार्च, २०२३ मध्ये पूर्ण करुन जिल्हानिहाय पुरवठेदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पुरवठेदारामार्फत शाळांना तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा नियमितपणे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून सुधारित नवीन अभ्यासक्रम शाळांमध्ये लागू करण्यात येणार असल्याबाबत

**(१३)** * **१९०६२ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सुधारित नवीन अभ्यासक्रम देशभरातील शाळांमध्ये लागू करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन अभ्यासक्रम शिकविण्यासाठी सर्व शाळांमध्ये शिक्षकांना नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्याची योजना आखली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या विषयामध्ये बदल झाला आहे त्या विषयाचे शिक्षक शाळेमध्ये उपलब्ध नसल्यास नवीन शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) केंद्र शासनाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार पायाभूतस्तर राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ (NCF-FS) रोजी प्रकाशित केलेला आहे. या अनुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्फत राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF-FS) निर्मिती आणि त्यानुसार तयार होणारा अभ्यासक्रम सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून लागू करणेबाबत प्रस्तावित आहे.
(२) व (३) पायाभूतस्तर राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF-FS) यावर आधारित पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व शाळेतील शिक्षकांना राज्यस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर याप्रमाणे प्रशिक्षण देण्याबाबतचे नियोजन करण्यात आलेले आहे. STAR अंतर्गत SCF-FS या अनुषंगाने

अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण अंगणवाडी ताई व इयत्ता १ ली व २री च्या शिक्षकांसाठी मंजूर करण्यात आले आहे.

दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण मसुदा केंद्र शासनामार्फत प्रकाशित करण्यात आलेला आहे. या मसुद्यावर समाजातून शिक्षक, अधिकारी, पर्यवेक्षीय यंत्रणा, पालक, विद्यार्थी, पत्रकार, विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी, इत्यादी वर्गातून त्यावर हरकती मागविण्यात येत आहेत. केंद्र शासनामार्फत मसुदा अंतिम करण्यासंदर्भात तज्ज्ञांशी चर्चा करुन मसुदा अंतिम करण्यात येणार आहे.

मसुदा अंतिम झाल्यानंतर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार शालेय शिक्षण स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा तसेच अभ्यासक्रम व पाठ्यक्रम विकसन, शिक्षक प्रशिक्षण कामकाज सुरु होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत केलेल्या करारातील कंपन्याच्या गुंतवणुकीबाबत

**(१४) * १९०८६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १८१६१ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्र सरकारने विविध कंपन्याशी सव्वा लाख कोटी रूपयांचे गुंतवणुकीचे करार केल्याने सर्वसाधारणपणे ३० हजार तरूणांना रोजगार उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील एमआयडीसी येथे कोल गॅसिफिकेशन प्रकल्प उभारण्यासाठी न्यू इरा क्लिनटेक सोल्युशन कंपनीसोबत दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असून, सदर कंपनीने रुपये २०,००० कोटींच्या गुंतवणुकीचा प्रस्ताव दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने करार केलेल्या कंपन्यांनी प्रत्यक्षात किती कोटी रूपयांची गुंतवणूक केली आहे, तसेच किती तरूणांना प्रत्यक्षात रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून उद्योग उभारणी, रोजगार व प्रत्यक्ष गुंतवणुकीसंदर्भातील शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

दावोस येथील जानेवारी-२०२३ मध्ये जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने १९ कंपन्यांशी १ लाख ३७ हजार ६६६ कोटी इतक्या रकमेचे सामंजस्य करार केले. सदर करारांबाबत १ लक्ष लोकांसाठी रोजगार निर्मिती होणार आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील एमआयडीसी येथे कोल गॅसिफिकेशन प्रकल्प उभारण्यासाठी न्यू इरा क्लिनटेक सोल्युशन कंपनीसोबत दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असून सदर कंपनी प्रकल्पात रुपये २०,००० कोटीची गुंतवणुक करणार असून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या १५,००० रोजगार निर्मिती होणार आहे. शासनाच्या दिनांक २९/०३/२०२३ रोजीच्या देकारपत्रान्वये सदर प्रकल्पास अतिविशाल प्रकल्पाचा दर्जा देऊन प्रोत्साहने देय करण्यात आली आहे.

सदर कंपनीने सादर केलेल्या प्रकल्प अहवालाची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तांत्रिक सल्लागार विभागाने तपासणी करुन सदर कंपनीची प्रस्तावित गुंतवणूक रुपये २०,००० कोटी असल्याबाबत तसेच १५०० लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे असे कळविले. सदर प्रकल्पास १५०० एकर भूखंडाची आवश्यकता आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंड वाटप समितीने ६३,७४,८०० चौ.मी. भूखंड वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर भूखंड वाटपाच्या अनुषंगाने कंपनीने इसारा रक्कम भरलेली आहे. त्यानुसार कंपनीस भूखंड वाटपपत्र व ताबा देण्याची कार्यवाही सुरू आहे. सद्य:स्थितीत उद्योग सुरू झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील इंडियाबुल्स एसईझेड प्रकल्पाची विनावापर जागा इतर उद्योगांना वाटप करण्याबाबत

**(१५) * १९७३९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुसळगाव (ता.सिन्नर,जि.नाशिक) या औद्योगिक वसाहतीमध्ये इंडियाबुल्स एसईझेड प्रकल्प बंद पडल्यामुळे या प्रकल्पासाठी शासनाने दिलेली २६०० एकर जागा विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसीकडून प्रकल्पाला जागा हस्तांतरित करताना विशिष्ट कालमर्यादेत प्रकल्प सुरू करण्याच्या अटीचा भंग झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा इतर उद्योगांना वाटप करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी व इतर संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील जमीन ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

अति. सिन्नर औद्योगिक क्षेत्र (SEZ) या औद्योगिक वसाहतीमध्ये केंद्र शासन सेझ अधिनियम २००५ दिनांक २७/१०/२००९ अन्वये मे.इंडियाबुल्स एसईझेड या प्रकल्पासाठी १०४७.८२ हे. आर. २६०० एकर) इतके वाटप करण्यात आलेले आहे. त्यामध्ये प्रोसेसिंग झोन - ५१२.०६ हे.आर., नॉन प्रोसेसिंग झोन- ४९९.१९ हे. आर. तसेच मे.युरोटस इं.लि-३६.३७ हे.आर. (सेझ मधून वगळलेले) एवढे क्षेत्र आहे.

मे. इंडिया बुल्स कंपनीने यांनी विहित मुदतीत भूखंडाचा विकास केलेला नसल्यामुळे सदर क्षेत्र (५१२.०६ हे. आर.) परत घेण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मे. इंडिया बुल्स कंपनीला

दिनांक २१/०२/२०२२ रोजी नोटीस पाठविली आहे. सदर प्रकरणी सिन्नर व नाशिक न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात येऊन सदर क्षेत्र ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

नॉन प्रोसेसिंग क्षेत्रापैकी ४३३.०५ हे. आर क्षेत्र हे मे. इंडियाबुल्स रियलटेकला औष्णिक विद्युत उभारणीसाठी दिलेला आहे. सदर प्रकल्प सद्य:स्थितीत बंद आहे. तसेच नॉन प्रोसेसिंग व प्रोसेसिंग संपूर्ण क्षेत्राला सुमारे ३८ कि.मी. लांबीचे कंपाउंड वॉल केलेले आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) मे. इंडिया बुल्स इंडस्ट्रीज इन्फ्रास्ट्रक्चर लि., सिन्नर यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत बहुउद्देशिय विशेष आर्थिक क्षेत्र उभारणीकरिता १०४७.८२ हे.आर. क्षेत्राचे वाटप करण्यात आले. तथापि, विहीत कालावधीत तेथे विशेष आर्थिक क्षेत्र विकसित झाले नाही. त्यामुळे सदर क्षेत्र महामंडळाने परत घेणे आवश्यक आहे. याबाबत विभागाच्या सचिवांकडे दिनांक २९/१०/२०२१ व २३/०२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सदर विशेष आर्थिक क्षेत्राकरिता अधिसूचित झालेले क्षेत्र विना-अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासनास सादर करण्याचे निर्देश महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायपूर व हिंगणा (ता.हिंगणा, जि.नागपूर) शहराला जोडणाऱ्या वेण्णा नदीवरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१६) * १९९१० श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपूर व हिंगणा (ता.हिंगणा, जि.नागपूर) या शहरांना जोडणारा वेण्णा नदीवरील पूल सन १९६२ मध्ये बांधण्यात आलेला असून, सदर जुन्या पुलाची दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दीड वर्षांपासून हिंगणा मार्गावर तसेच हिंगणा नाक्यापासून हिंगणा आऊटरिंग रोडपर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम सुरु असून, त्याठिकाणी असलेल्या जुन्या पुलाची दुरवस्था झाली असतानाही संबंधित कंत्राटदाराने त्याकडे दुर्लक्ष केले असून या रस्त्यावरील वाहतूक सुरु असल्याने ये-जा करण्यासाठी अडचण होत असल्याने अपघाताची भिती वर्तविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुरवस्था झालेल्या पुलांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, पुलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) नाही.

(२), (३) व (४) नागपूर हिंगणा विरुळ रा.मा.३२१ या रस्त्यावर हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत मंजूर काम भौतिकदृष्टया ९०% पूर्ण झाले आहे. सदर कामामध्ये सा.क्र. कि.मी १५/१४० मधील वेण्णा नदीवरील पुलाची संरक्षणात्मक तपासणी करण्यात आली असून, पुलाच्या दुरुस्तीची कामे आवश्यक वाहतूक सुरक्षा उपाययोजनेसह पूर्ण करण्यात आली आहेत. सदर ठिकाणी अपघात झाल्याची नोंद नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात आदिवासी वसतिगृह बांधणे आणि आदिवासी संशोधन अध्यासन केंद्र सुरू करण्याबाबत

**(१७) * १९९९७ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात आदिवासी वसतिगृह बांधणे आणि आदिवासी संशोधन अध्यासन केंद्र सुरू करण्यात यावे, अशी मागणी वारंवार शासनाकडे व मुंबई विद्यापीठ प्रशासनाला करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात आदिवासी मुला-मुलींसाठी वसतिगृह बांधणेकरीता शासनाने सन २०१४ मध्ये निधी उपलब्ध करून देऊनही विद्यापीठाने वसतिगृहाच्या बांधकामासाठी भूखंड उपलब्ध करून दिलेला नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून वसतिगृह बांधण्याची बाब प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कार्यवाही करुन आदिवासी समाजाच्या मुलां-मुलींसाठी मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात नवीन वसतिगृह बांधण्याकरीता निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबई विद्यापीठाची पूर्ण व्यवस्थापन परिषद अस्तित्वात आल्यानंतर या परिषदेपुढे प्रस्ताव सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्ले स्कुल, प्री प्रायमरी, केजी, नर्सरी शाळांवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(१८) * १९२०३ श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शहरांसह गावागावातील प्ले स्कुल, प्री प्रायमरी, केजी, नर्सरी शाळांवर कुणाचेही नियंत्रण नसल्याने शाळांच्या नावाखाली भरसाठ शुल्क घेणे, मनमानी पध्दतीने शाळा चालवणे, शुल्क निर्धारित न ठेवणे असे प्रकार सुरु असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुरु असलेल्या प्ले स्कुल, प्री प्रायमरी, केजी, नर्सरी शाळांवर नियंत्रण आणण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ मध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांचा समावेश करण्यात आलेला नाही. तथापि, केंद्र शासनाच्या नवीन शिक्षण धोरण-२०२० अंतर्गत पूर्व प्राथमिक शिक्षणाचे नियमन करण्याची बाब प्रस्तावित आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील टोलनाक्यांवरील फास्टॅगमुळे आर्थिक लुबाडणूक होत असल्याबाबत

**(१९) * १९९५४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोल नाक्यांवरील वाहनांच्या वाढत्या रांगामुळे व रोख रकमेला आळा बसावा यासाठी फास्टॅग बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फास्टॅगमध्ये रक्कम जमा नसल्यास किंवा रक्कम वजा झाल्यास त्यात ऑनलाईन रक्कम जमा करण्यास अडचणी येत असल्यामुळे वाहनधारकांना नाहक दुप्पट टोल द्यावा लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकारची दुप्पट टोल वसूली रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) राज्यातील पथकर स्थानकावर फास्टॅग प्रणाली टप्याटप्याने कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

(२) फास्टॅग मध्ये पुरेशी रक्कम शिल्लक असणे आवश्यक आहे, अन्यथा पथकर स्थानकावर दंडनीय दराने पथकर भरावा लागतो. फास्टॅगसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली नसल्यास त्या फास्टॅग मध्ये ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरली जाऊ शकत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्बवत नाही.

-----------------

## राज्य ग्राहक आयोग व जिल्हा ग्राहक न्याय मंच मधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) * १९८०७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ९०४३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्राहकांच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेला राज्य ग्राहक आयोग व जिल्हा ग्राहक न्याय मंच यातील सदस्य आणि कर्मचारी यांची पदे रिक्त असून, ३१ जिल्हयांतील जिल्हा ग्राहक न्याय मंचाच्या अध्यक्षांचीदेखील पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ७० हजारांहुन अधिक तक्रारी राज्य ग्राहक आयोग व जिल्हा ग्राहक न्याय मंच यांचेकडे प्रलंबित असून, ग्राहक आयोगाच्या कामकाजाला गती देण्यासाठी रिक्त पदे भरण्याचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य अशी एकूण २५ रिक्त पदे भरण्यासाठी ऑनलाईन परिक्षेचे आयोजन करण्यात आले असून, प्रबंधक, गट-ब (राजपत्रित) संवर्गाची ४० पदे मंजूर असून त्यामधील सरळसेवेने भरावयाच्या २० पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे दिनांक १५ जून, २०२० च्या पत्रान्वये मागणीपत्र सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे दिनांक १५ जून, २०२० च्या पत्रान्वये केलेल्या मागणीच्या अनुषंगाने व प्रलंबित तक्रारींचा विनाविलंब निपटारा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१), (२), (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने सी.ए.क्र.८३१/२०२३ मध्ये दिनांक ३/०३/२०२३ रोजी व एम.ए.क्र. ३९७/२०२३ मध्ये दिनांक २४/०३/२०२३ रोजी दिलेल्या निर्णयानुसार राज्य आयोगातील सदस्य व जिल्हा आयोगातील अध्यक्ष व सदस्य यांची ११२ रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## मुंबईतील अंधेरी येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पदवी प्रदान समारंभात अपमानास्पद वागणूक मिळाल्याबाबत

**(२१) * १८८८७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील भारतीय विद्याभवन संचालित सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभात काही मागासवर्गीय विद्यार्थांना पूर्ण प्रवेश शुल्क भरले नसल्यामुळे पदवी घेण्यापासून रोखण्यात आल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने जाणीवपुर्वक पदवी प्रमाणपत्र दिले नसून अन्य जातींच्या विद्यार्थ्यांसमोर भेदभावाची वागणूक देऊन अपमानीत केल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१८ मध्ये महाविद्यालय व्यवस्थापनेच्या सूचनेनुसार या अभ्यासक्रमास मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेले नियोजित शुल्क भरून प्रवेश दिला होता, यानंतर ४ वर्षांच्या कालावधीत वाढीव शुल्काबाबत कोणतीही माहिति विद्यार्थांना देण्यात आली नसून, ऐनवेळी पदवी प्रदान समारंभाच्या ४ दिवस आधी नोटीस पाठवून वाढीव शुल्क भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठ, महाविद्यालय मागासवर्गीय कक्ष आणि समाजकल्याण आयुक्त यांचेकडे तक्रार करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशाप्रकारे शुल्क वसुलीच्या नावाखाली मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या संबंधित संस्थाचालकांवर तसेच विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय खरे आहे.

(२) संस्थेच्या दिनांक १०/०५/२०२३ रोजीच्या पदवीप्रदान समारंभाबाबतच्या परिपत्रकात शिक्षण शुल्क भरणेबाबत नमूद अटींची पूर्तता होत असल्यासच संबंधित विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येईल, असे नमूद आहे. तथापि, अशा स्वरुपाची विद्यार्थ्यांची तक्रार तंत्र शिक्षण संचालनालयास प्राप्त झालेली नाही.

(३) होय, खरे आहे.

संस्थेच्या दिनांक १०/०५/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांना संस्थेकडून कळविण्यात आले आहे.

(४) यासंदर्भात तंत्र शिक्षण संचालनालयाकडे अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली नसल्याने सदर प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालय, मुंबई विद्यापीठ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडून सविस्तर अहवाल घेण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## दहावीनंतर विद्यार्थ्यांकरिता कलचाचणी पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(२२) * १९५१८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून दहावीनंतर विद्यार्थ्यांच्या मनातील कल जाणून घेण्यासाठी सन २०१६ पासून कलचाचणी घेण्यात येत होती, तथापि, सदर कलचाचणी कोविड कालावधी नंतर बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकतेच दहावी व बारावीचे निकाल लागले असून विद्यार्थ्यांना करिअरबाबत मार्गदर्शन देणारी कलचाचणीच बंद केल्यामुळे विद्यार्थी व पालक संभ्रमात पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कलचाचणी बंद करण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कलचाचणी पुर्ववत सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.
(२) नाही.
(३) १० वीच्या विद्यार्थ्यांना मोफत व गुणवत्तापूर्ण करिअर मार्गदर्शन देण्यासाठी संबंधित संस्थेशी करण्यात आलेला करार दिनांक ३१/१२/२०२० रोजी संपुष्टात आला आहे त्यामुळे कलचाचणी बंद करण्यात आली आहे.
(४) दिनांक २५/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयनुसार राज्यातील शालेय विद्यांर्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन देण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत "टेक्स्टाईल म्युझियम" (कापड गिरणी संग्रहालय) उभारण्याबाबत

**(२३) * १९८८२ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या विकासाला हातभार लावणाऱ्या गिरण्यांचा इतिहास, त्यांचे सामाजिक काम आणि विविध पैलूंचे दर्शन घडविणारे "टेक्स्टाईल म्युझियम" (कापड गिरणी संग्रहालय) केंद्र सरकारच्या युनायटेड टेक्सटाईल मिल क्रमांक दोन आणि तीनच्या भूखंडावर उभारण्याचा निर्णय सन २०११ मध्ये होऊनही सदर प्रकल्प अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने "टेक्स्टाईल म्युझियम" (कापड गिरणी संग्रहालय) हा प्रकल्प प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, तसेच "टेक्स्टाईल म्युझियम" (कापड गिरणी संग्रहालय) उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर प्रस्तावास "मुंबई संस्कृती वारसा जतन समिती" ची ना-हरकत दिनांक ११/०६/२०१८ रोजी प्राप्त झाली आहे. सदर काम राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या इंडिया मिल नं. २ व ३ येथील माझगांव विभागातील न.भू.क्र. ८३१ (भाग) भूभागावर तीन टप्प्यांत करण्यात येत असून, टप्पा क्र.

१ चे काम लवकरच पूर्ण होणे अपेक्षित आहे व टप्पा क्र. २ व ३ मध्ये “टेक्स्टाईल म्युझियम” (कापड गिरणी संग्रहालय) च्या सध्याच्या परिस्थितीच्या अनुषंगाने संरचनात्मक परिरक्षण अहवाल तयार करुन सुधारीत आराखडा व निविदा प्रक्रिया लवकरात लवकर हाती घेण्यात येत आहे.

(२) व (३) सदर भूभागावरील प्रस्तावित टेक्स्टाईल म्युझियमच्या कामातील टप्पा क्र. १ मधील ७००० चौ.मी. भूखंडावरील काम सन २०१६ मध्ये सुरु करण्यात आले. तथापि, सदर भूखंडावरील झाडे स्थलांतरीत करण्याच्या व तोडण्याच्या प्रस्तावास माहे डिसेंबर, २०२० मध्ये वृक्ष प्राधिकरणाची मंजुरी मिळाली. तसेच कोविड महामारीमुळे टप्पा क्र. १ ला विलंब झाला. तथापि, टप्पा क्र. १ चे काम दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

टप्पा क्र. २ व ३ साठी आवश्यक ३७,००० चौ.मी. भूखंडापैकी १०,००० चौ.मी. जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली नाही. सदर भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावे मालमत्ता पत्रकात हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर भूखंडावरील पुरातन वास्तुंचे संरचनात्मक परिक्षण करुन सुधारित आराखडा तयार करण्यात येणार आहे. सदर आराखड्यास पुरातन वास्तुजतन समितीचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन अंदाजपत्रक निविदा प्रक्रिया करण्यात येणार आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या बीएमएस व बीए या शाखांच्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेत गैरप्रकार झाला असल्याबाबत

**(२४) * १९५७३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने तृतीय वर्ष बीएमएस अभ्यासक्रमाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना शुन्य गुण दिल्याचे निदर्शनास आले असून, याबाबत २१६ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे मे, २०२३ मध्ये जाहीर केलेल्या बीए (मानसशास्त्र) सेमिस्टर पाचच्या पेपरचा निकाल तब्बल ६ महिने उशिराने जाहीर झाला असून त्यातही गैरप्रकार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तीन महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांची संपुर्ण तुकडी शुन्य गुण दिल्याने नापास झाली आहे, तर अनेकांना १०० पैकी १०० आणि काहींना १०० पैकी ९९ गुण दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदोष निकाल जाहीर करून मुंबई विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या बीएमएस अभ्यासक्रमाच्या ५ व्या सत्राच्या परीक्षेला ज्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका, उपस्थितीचा अहवाल तसेच पर्यवक्षक अहवाल मध्ये प्रश्नपत्रिका कोड, बार कोड तसेच आसन क्रमांक चुकीचा लिहिला होता अशा विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिका तपासून निकाल घोषित

करताना संगणक प्रणालीवरील उत्तरपत्रिका तपासणी पध्दतीमध्ये गुण मिळणे कठीण होते. या कारणास्तव उर्वरीत विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करताना दिरंगाई होऊ नये म्हणून अशा २१६ विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेऊन संगणक प्रणालीद्वारे शुन्य गुण दर्शवून निकाल राखीव ठेवण्यात आला होता.तथापि, या सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका व इतर अहवालांचे परिक्षण करुन सुधारीत निकाल जाहीर करण्यात आले आहेत.
(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

काही महाविद्यालयांनी तृतीय वर्षे सत्र ५ च्या मानसशास्त्र या विषयाच्या नविन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका वितरीत केल्यामुळे सदर विषय तात्पुरत्या स्वरुपात वगळून इतर विषयांचा निकाल दिनांक १५/०४/२०२३ रोजी घोषित करण्यात आला तद्नंतर सदरची बाब लक्षात घेऊन परीक्षा मंडळाने मंजूर केलेल्या ठरावानुसार उत्तरपत्रिका ऑफलाईन तपासून सदर विद्यार्थ्यांचे निकाल दिनांक २९/०४/२०२३ रोजी जाहीर केले. परंतु, जाहीर केलेल्या निकालात त्रुटी आढळल्याने या प्रकरणी कुलगुरुंनी त्रिसदस्यीय चौकशी तथा तज्ञ समिती गठीत करुन या समितीच्या मार्गदर्शनाने दिनांक ३०/०५/२०२३ रोजी मानसशास्त्र या विषयाचा सुधारीत निकाल जाहीर करण्यात आला आहे.
वरील वस्तुस्थितीमुळे बीए (मानसशास्त्र) पाचव्या पेपरचा निकाल ४ महिन्यांनी जाहीर करण्यात आला. यामध्ये कोणताही गैरप्रकार झालेला नाही.
(४) सदर प्रकरणी कुलगुरुंनी त्रिसदस्यीय चौकशी तथा तज्ञ समिती गठीत केली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालानुसार विद्यापीठामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील पलुस तालुक्यातून जाणाऱ्या विजापूर-गुहागर राष्ट्रीय महामार्गावरील पुलांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२५) * १८८५२ श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ७२२२ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील पलुस तालुक्यातून जाणाऱ्या विजापूर-गुहागर येथील राष्ट्रीय महामार्गाचे काम तांत्रिकदृष्टया पूर्ण झाले असले तरी महामार्गादरम्यान असणाऱ्या ओढे-नाल्यावरील पुलांची कामे अपुर्णावस्थेत असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्गाच्या कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्यामुळे सदर महामार्गावर डायव्हेंशन फलक, सुरक्षा फलक, साईन बोर्ड, बॅरिकेटस व ग्रील लावणे, सिग्नल यंत्रणा इ. उपाययोजना न केल्यामुळे कुंडल फाटयानजीक वारंवार अपघात होऊन नागरिक दगावण्याच्या व जखमी होण्याच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ताकारी ते पाचवा मैलपर्यंत दहा ते बारा पुलांची कामे अपूर्णावस्थेत असल्याने रस्त्याच्या आजुबाजूला असणाऱ्या दुकानदार, शेतकरी व जनतेला तेथील पुलावरील माती व धुळीचा त्रास होऊन त्याचा आरोग्यावर परिणाम होऊन आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने सदर अपूर्णावस्थेत असलेल्या पुलांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

सदर काम करतेवेळी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. कुंडल फाटा नजीक उपाययोजना अभावी अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) सद्य:स्थितीत ताकारी ते पाचवा मैल पर्यंत अपूर्ण असलेल्या १६ छोटे पूल/बॉक्स मोरीवर डांबरीकरणाचे डी.बी.एम.थराचे काम पूर्ण झाले आहे. बी.सी.थराचे काम प्रगतीत आहे. त्यामुळे आता रस्त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या दुकानावर, शेतीवर, पुलावरील माती व धुळीचा त्रास नाही.
(४) १६ छोटे पूल व बॉक्स मोरीची बांधकामे रस्त्याच्या अपुऱ्या उपलब्ध रुंदीमुळे व निविदा प्रक्रियेस ५ वर्षे झाल्याने या कामाच्या कंत्राटदाराने ही कामे करण्यास असमर्थता दाखविली. ही कामे मूळ कामातुन वगळण्याचा प्रस्ताव रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडुन माहे मार्च, २०२३ रोजी मंजूर झाला आहे.

या अपूर्ण पुलाच्या पुर्नबांधणीसाठीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत असून सदर कामे वार्षिक आराखडा २०२३-२४ मध्ये प्रस्तावित आहेत. यास मंजुरी प्राप्त झाल्यावर सदर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पुरप्रवण क्षेत्रातील गावांमध्ये नवसंजीवनी योजना राबविण्याबाबत

**(२६) * ११९१७८ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुरप्रवण क्षेत्रातील गावांना नवसंजीवनी योजनेच्या माध्यमातून पावसाळयापूर्वी तीन महिन्यांचे धान्य दिले जाणार असून या योजनेची अंमलबजावणी राज्यात केली जाणार असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील योजनेच्या माध्यमातून पुरप्रवण क्षेत्रातील गावांना त्यात समाविष्ट करुन तीन महिन्यांचे धान्य माहे मे,२०२३ अखेरपर्यंत गावांत पोहोचविण्याचे आदेश शासनाने अन्न नागरी पुरवठा विभागास दिले असतानाही अद्याप कोणत्याही गावांना धान्याचा पुरवठा करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुरप्रवण क्षेत्रातील गावांना नवसंजीवनी योजनेच्या माध्यमातून अद्याप धान्य वाटप न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

नवसंजीवन योजनेंतर्गत सन २०२३ मध्ये धान्य पुरवठा करण्याबाबत तातडीची उपाययोजना करून सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २२/०५/२०२३ रोजीच्या आदेशान्वये क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(२) नवसंजीवन योजनेंतर्गत राज्यातील १६ जिल्हे अंतर्भूत आहेत. त्यापैकी धुळे, जळगाव, नंदुरबार, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, नांदेड, ठाणे, पालघर, रायगड, पुणे (ग्रामीण) या ११ जिल्ह्यांमध्ये माहे जून, २०२३ ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीचे रेशनचे धान्य वितरीत करण्यात आले आहे. नाशिक, अहमदनगर, गोंदिया, चंद्रपूर, नागपुर या ५ जिल्ह्यांतील गावांचा पावसाळयात संपर्क तुटत नाही. त्यामुळे सदर जिल्ह्यातील गावांना प्रचलीत पध्दतीने धान्य पुरवठा करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जामनेर (जि.जळगाव) येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील बेकायदेशीर शिक्षक भरती प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(२७) * १९२६४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामनेर (जि.जळगाव) येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये बेकायदेशीर शिक्षक भरती प्रकरणी श्री.पारस झुम्बरलाल ललवाणी यांनी दिनांक १५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास जामनेर पोलीस स्टेशनला तक्रार केलेली असून त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

जामनेर (जि.जळगांव) येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये बेकायदेशीर शिक्षक भरतीबाबत श्री.पारस ललवाणी यांनी जामनेर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केलेली आहे.
(२) याबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदूरबाजार (जि.अमरावती) येथील डांबरी रस्त्याच्या बांधकामात अनियमितता झाल्याबाबत

**(२८) * १९६६१ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) येथील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत शहराच्या वलगाव मार्गावर घोषित टोम्पे महाविद्यालय ते परत सोडा फाट्यापर्यंत सुरू असलेल्या डांबरी रस्त्याच्या बांधकामात अनियमितता होत असल्याची तक्रार नागरिकांनी केल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता काही ठिकाणी उंच तर काही ठिकाणी खाली केलेला असून पावसाळयात या रस्त्यावर पाणी येण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या कामाची चौकशी गुणवत्ता नियंत्रण मंडळाकडून करून रस्ता पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) दिनांक १९-०४-२०२३ रोजी वृत्तपत्रात सदर कामाबाबत बातमी प्रसिध्द झाली होती.
(२) व (३) सदर कामाच्या करारनाम्यातील विनिर्दिष्ट मानके, तरतूदी व रस्त्यावरील पाण्याचा निचरा होण्याकरीता आवश्यक ती उपाययोजना करुन सद्य:स्थितीत सदरचे काम प्रगतीत असून माहे डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
कामाची नियमित तपासणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांनी केली असून आक्षेपार्ह बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या आणि केंद्रीय मंडळाच्या शाळांना मराठी भाषा सक्ती आणि मुल्यांकनातून सूट देण्याच्या निर्णयाबाबत

**(२९) * १८९४१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या आणि केंद्रीय मंडळाच्या शाळांना मराठी भाषा सक्ती आणि मुल्यांकनातून तीन वर्षांची सूट देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील केवळ सहा अल्पसंख्याक व अमराठी शाळांच्या मुख्याध्यापकांनी ३०० पालकांच्या सह्यांचे निवेदन दिल्याच्या आधारावर मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी केंद्रीय मंडळाच्या शाळांना मराठीच्या सक्तीतून मुभा देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत शासनाने राज्यातील सर्वच शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीसाठी कायदा केल्यानंतर विद्यमान शासनाकडून सदर कायद्याची अंमलबजावणी न करण्याचे नेमके प्रयोजन काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इंग्रजी माध्यमांच्या आणि केंद्रीय मंडळाच्या शाळांना मराठी भाषा सक्ती आणि मुल्यांकनातून तीन वर्षांची सूट देण्याच्या निर्णयाचा शासन फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक ०१ जून, २०२० नुसार राज्यातील सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी विषय हा सक्तीचा करण्यात आलेला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी सन २०२०-२१ पासून इयत्ता पहिली व सहावी पासून टप्या-टप्याने सुरु करण्यात आली आहे. तथापि, कोविड-१९ मुळे सदर कालावधीत नियमित शाळा सुरु राहण्यास अनेक अडचणी आलेल्या होत्या. त्यामुळे राज्य अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त इतर परीक्षा मंडळाच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनामध्ये व पर्यायाने संपादणूकीमध्ये अडचणी आल्याचेलोकप्रतिनिधी, मुख्याध्यापक व पालक यांनी समक्ष भेटून तसेच निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले होते.

यानुषंगाने राज्य मंडळाच्या शाळां व्यतिरिक्त इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये सन २०२३-२४ पासून फक्त पुढील तीन वर्षापर्यंत इयत्ता ८, ९ व १० वी वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मराठी विषयाचे मुल्यांकन करतांना श्रेणी स्वरुपात (अ, ब, क, ड) करण्याबाबतचा निर्णय दिनांक १९ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे. सदर निर्णय फक्त एकाच बॅचला लागू ठरेल.

राज्यातील सर्व परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे आहे, यामधून कोणत्याही प्रकारची सूट देण्यात आलेली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेगाव (जि.अकोला) पालखी मार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३०) * १८९५७ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव (जि.अकोला) पालखी मार्गाचे काम सन २०१९ मध्ये मंजूर होऊन ३७१ कोटी रुपयांचा करार करण्यात येऊन कामाला प्रारंभ झाला, मात्र गेल्या चार वर्षात रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे,२०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ३७१ कोटी रुपयांचा करार करून अद्यापपर्यंत ११३ कोटी रुपयांची देयके अदा करण्यात आली असूनही रस्त्याचे काम पूर्णत्वास नेण्याबाबत कंत्राटदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनास्थेमुळे आजही रस्त्याची दुरवस्था झालेली असल्याने भाविक जनतेला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ३७१ कोटी रुपयांचा करार करून अद्यापपर्यंत ११३ कोटी रुपयांची देयके अदा करण्यात आली असूनही उक्त

पालखीमार्गाचे काम अपूर्णावस्थत ठेवणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली तसेच या ठेकेदारांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत मंजूर काम सद्य:स्थितीत भौतिक दृष्टया ७३.१०% पूर्ण झाले आहे.
(२) व (३) कोविडच्या प्रादुर्भावामुळे, सेवावाहिन्या स्थंलातरीत करणे, आवश्यक परवानग्या प्राप्त करणे, शेतकऱ्यांनी हरकत घेतल्याने, गौणखनिज उत्खनन बंदीमुळे, जमिनीचे वाद, अतिवृष्टी, अतिक्रमणे इ. मुळे सदर कामाच्या भौतिक प्रगतीवर परिणाम झाला हे खरे आहे. सदर कामावर सद्य:स्थितीत रक्कम रुपये २९१.११ इतका खर्च झाला असून सदरचे काम दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी शाळा व तुकड्यांच्या अनुदान वाटपामध्ये गैरव्यवहार केल्याबाबत

**(३१)** * **१९४४३ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन शाळांना अनुदान व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ देणेबाबत शासनाने दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी शासन आदेश काढून निधी उपलब्ध करून दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन आदेश काढत असताना काही अटींची पूर्तता या शाळा व तुकड्या यांनी करणे गरजेचे होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील शाळा व तुकड्यांना अनुदान देत असताना तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अनावश्यक कागदपत्रांची मागणी करुन दिनांक ३१ मार्च,२०२३ रोजीच्या रात्री ११.४० वाजता फक्त १४% च शाळेतील कर्मचाऱ्यांना पात्र करून व बाकी ८६ % कर्मचाऱ्यांना अपात्र करून याद्या वेतन पथक अधीक्षक यांच्याकडे निधी खर्ची पडणार नाही या उद्देशाने दिल्या असून शिक्षकांची अडवणूक करून भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) शासन निर्णय, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ अन्वये अनुदान पात्र शाळा/ तुकड्यांवरील शिक्षक/ शिक्षकेतर पदांना प्रत्यक्ष अनुदान मंजूर करण्याकरीता अटी व शर्ती विहीत करण्यात आल्या आहेत. सदर

अटी व शर्तीनुसार शाळांना अनुदानासाठी पात्र ठरविताना तत्कालिन शिक्षणाधिकारी यांना काही कागदपत्रातील जावक नंबर बाबत साशंकता असल्याने, अनुदानासाठी पात्र ठरलेल्या शाळेतील काही कर्मचाऱ्यांचे वेतन/ टप्पा वाढ वेतन स्थगित करण्यात आले होते. शाळांना अनुदान मंजूर करण्यापूर्वी शासन निर्णयातील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक असल्याने, १४ टक्के शाळांच्या अनुदानाच्या प्रस्तावाबाबत ३१ मार्च, २०२३ अखेरीस निर्णय घेण्यात आला.

या प्रकरणी शिक्षकांची अडवणूक करुन भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंहगड (जि.पुणे) येथील रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३२) * १८९७२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड (जि.पुणे) येथील रस्त्याचे गेल्या चार वर्षांपासून सुरु असलेले काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर दुभाजक, पावसाळी गटारे, पुलाची अर्धवट कामे, विदयुत वाहिनी भूमिगत करणे आदि कामे अदयापही अपूर्ण असल्याने अपघातांचे प्रमाणे वाढले असून, दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी महाविद्यालयीन तरुणांच्या झालेल्या अपघातामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चार वर्षांपासून रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत ठेवणाऱ्या संबंधित ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली तसेच सदर रस्त्याचे अपूर्णावस्थेत असलेले काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत मंजूर काम सद्य:स्थितीत भौतिक दृष्टया ९०% पूर्ण झालेले आहे,

(२) सदर रस्त्यावर दिनांक ६/०४/२०२३ रोजी दुचाकी वाहनचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात झाल्याची व उपचारादरम्यान सहप्रवासी मयत झाल्याची संबंधित पोलीस स्टेशन मध्ये नोंद आहे.

(३) सदर प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ शिक्षकांचे उन्नयन समावेशन आणि पूर्णवेळ करण्याबाबत

**(३३) * २०१९६ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ जिल्ह्यांतील एकूण ११८ अर्धवेळ माध्यमिक शिक्षक सन २००० पासून आजपर्यंत कार्यरत असून सदर शिक्षकांनी सन २०१६ पासून उन्नयन समावेशन आणि पूर्णवेळ करण्याकरीता निवेदने

दिली असून तत्कालीन शिक्षण मंत्री यांनी दिनांक ९ मार्च, २०१८ रोजीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सर्व शिक्षकांना पूर्णवेळ करून कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याचा निर्णय जाहीर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने सदर १४ जिल्हयांतील एकूण ११८ अर्धवेळ शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्याकडून माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ शिक्षकांच्या उन्नयनाबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून तो शासन स्तरावर तपासून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील मिहान प्रकल्पातील जमिनीसाठी २० कंपन्यांनी जमीन प्रस्तावाच्या आधारे कर्ज घेऊन शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(३४)** * **२०२७९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पातील जमिनीसाठी २० कंपन्यांनी २३.२५ कोटी रुपये टोकन रक्कम (ईएमडी) देत जमीन प्रस्तावाच्या आधारे कर्ज घेऊन सध्याच्या बाजारभावाप्रमाणे सुमारे २०३ कोटी इतक्या किंमतीच्या जमिनीवर अतिक्रमण केले असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकास आयुक्त कार्यालयाने गत वर्षीच त्यांचे स्वीकृती पत्र रद्द केले आणि जमिनी परत घेण्याच्या सूचना ‘एमएडीसी’ला दिल्या, परंतु, सदरहू कार्यालयातील अधिकारी व कर्मचारीच त्याबाबतच्या नस्त्या गहाळ करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदरहू कंपन्यांकडून जमिनी परत घेऊन जमीन प्रस्तावाच्या आधारे कर्ज घेऊन शासनाची फसवणूक करणाऱ्यांविरुध्द तसेच नस्त्या गहाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) विकास आयुक्त कार्यालयाने गत वर्षी २० कंपन्याची स्वीकृती पत्र रद्द केले आणि जमिनी परत घेण्याच्या सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला दिल्या आहेत. परंतु, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या कार्यालयात याबाबतच्या सर्व नस्त्या उपलब्ध असून अधिकारी व कर्मचारीच त्याबाबतच्या नस्त्या गहाळ करीत असल्याचेही निदर्शनास आले नाही.

कंपन्यांनी जमीन प्रस्तावाच्या आधारे कर्ज घेवून शासनाची फसवणुक केल्याबाबत आढळुन आलेले नसल्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने कळविले आहे. त्यामुळे शासनामार्फत चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षण विभागातील गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करण्याबाबत

**(३५) * २०४४३ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागात बदल्या, बढती, शाळांना मान्यता, शिक्षकांना मान्यता देणे, इत्यादीसांठी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असून शिक्षणाधिकारी, नाशिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्यानंतर केलेल्या तपासणीमध्ये अवैध मालमत्ता सापडली असल्याने याच पार्श्वभूमीवर शिक्षण आयुक्त यांनी शिक्षण विभागातील जवळपास ३६ अधिकाऱ्यांची लाचलूचपत विभागामार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी शिक्षणाधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच शिक्षण विभागातील ३६ अधिकाऱ्यांची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करण्यात यावी, या केलेल्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) आयुक्त, शिक्षण यांच्या मागणीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशीबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले महिला वसतिगृहातील सीसीटीव्ही यंत्रणा पूर्ववत करण्याबाबत

**(३६) * २०४७१ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले महिला वसतिगृह, चर्नी रोड ह्या साडेचारशे विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या वसतिगृहात सद्य:स्थितीत ४० ते ४५ तरुणी राहत असून गत एका वर्षापासून येथील सीसीटीव्ही यंत्रणा बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहातील तळ मजल्यावरील काही सीसीटीव्ही यंत्रणा बंद असून, याबाबत वसतिगृह प्रशासनाने संबंधित यंत्रणेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रार देऊनही सीसीटीव्ही यंत्रणा पूर्ववत का करण्यात आली नाही याबाबतचा अहवाल महिला आयोगाच्या सदस्यांनी मागविला असून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी कार्यवाही करण्याचे आश्वासन महिला आयोगाने दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले महिला वसतिगृहातील सीसीटीव्ही यंत्रणेसंदर्भात तक्रार देऊनही यंत्रणेच्या दुरुस्तीच्या कामात दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर तसेच वसतिगृहाच्या सुरक्षेसंदर्भात कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) दिनांक ६/०६/२०२३ रोजी सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थीनीवरील अत्याचार व हत्या या दुदैवी घटनेबाबत महिला आयोगाचे प्रतिनिधी यांनी दिनांक ७/०६/२०२३ रोजी वसतिगृहास भेट देवून माहिती घेतली आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्यातील सर्वच शासकीय वसतिगृहांची सुरक्षा तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ७/०६/२०२३ अन्वये संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनूसार सर्व वसतिगृहांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वसतिगृहांच्या परिसरात अद्ययावत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याच्या निर्देशासह अन्य करावयाच्या उपाययोजनांबाबत शासन निर्णय दिनांक २८/०६/२०२३ अन्वये विस्तृत निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील सहा धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले नसल्याबाबत

**(३७) * १९६८५ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १०८२५ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महाडमधील सावित्री नदीवरील पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत अनेक प्रवाशांना जीव गमवावा लागल्याने राज्य शासनाने धोकादायक पुलांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश देवून सात वर्षे पूर्ण होऊनही मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील सहा धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट अद्याप झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे मोरचोंडी, केळघर फरशी, गारगई पिंजाळ, देव बांध, गारगई, बेरिस्ते या मार्गावरील धोकादायक पुलावरून प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुरवस्था झालेल्या पुलाच्या पिलरमधील सळया बाहेर आल्या आहेत, पुलाचे कठडे तुटले आहेत. पुलावर झाडे झुडपे उगवली आहेत, तर मोखाडा बिरीस्ते आणि पोशेरा- हिरवे- बेरिस्ते या मार्गावरील दोन पूल पावसाळ्यात पाण्याखाली जात असल्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने नागरिकांचा तालुक्याशी संपर्क तुटतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मोखाडा तालुक्यातील दुरवस्था झालेल्या ६ पुलांवर मोठी दुर्घटना होऊ नये तसेच सदर धोकादायक असणाऱ्या ६ पुलांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना/कार्यवाही करण्यात आली,
(५) असल्यास, सदर ६ धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट न करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) पालघर वाडा देवगांव रा.मा.३४ वरील गरगाई पिंजाळ पूल, मोखाडा, खोडाळा विहिगाव रा.मा.७८ वरील देवबांध पूल, मोखाडा ते बेरिस्ते प्रजिमा-१९ वरील सा.क्र. कि.मी. २/२०० वरील पूल, मोखाडा पोशेरा बेरिस्ते प्रजिमा- २० या रस्त्यावरील सा.क्र.९/०० व सा.क्र.२९/५०० येथील दोन पूल सुस्थितीत आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्र. १६०अ वर सा.क्र. कि.मी.११९/५०० वरील मोरचोंडी पूल व सा.क्र. कि.मी.१३२/८०० वरील केळघर फरशी पूल या दोन पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिटचे काम लवकर हाती घेण्याचे नियोजन आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) राष्ट्रीय महामार्ग क्र. १६०अ वर सा.क्र. कि.मी.११९/५०० वरील मोरचोंडी पूल व सा.क्र. कि.मी.१३२/८०० वरील केळघर फरशी पूल या दोन पूलांच्या दुरुस्तीचे कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे लवकर हाती घेण्याची नियोजन आहे.

पालघर वाडा देवगांव रा.मा.३४ वरील गरगाई पिंजाळ पूल, मोखाडा, खोडाळा विहिगाव रा.मा.७८ वरील देवबांध पूल सुस्थितीत आहेत.

मोखाडा ते बेरिस्ते प्रजिमा-१९ व मोखाडा-पोशेरा-बेरिस्ते प्रजिमा-२० या रस्त्यावरील पूल बुडीत प्रकारचे पूल असल्याने अतिवृष्टी दरम्यान सदर तिन्ही पूल पाण्याखाली जातात.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा उपदान लागू करणेबाबत

**(३८) * १९३२९ श्री.किरण सरनाईक, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान लागू करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २००५ पुर्वी नियुक्त खाजगी मान्यता प्राप्त शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उक्त योजना लागू करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णात निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

वित्त विभागाने शासन निर्णय, दिनांक ३१ मार्च, २०२३ अन्वये, परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदाचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना द्यावयाच्या कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेसाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने योग्य त्या फेरफारासह दिनांक १४/०६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये लागू केल्या आहेत.
(२) जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेचे सभासद आहेत, अशा शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उक्त योजना लागू आहे.
(३) राज्यातील जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक /उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक १४ जून, २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे काम बंद असल्याबाबत

**(३९) * १९८३६ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६ मध्ये मुंबईतील अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवस्मारक प्रकल्पाच्या कामाचे मा.पंतप्रधान यांचे हस्ते जलपूजन करण्यात आले होते, तसेच या प्रकल्पाचे कार्यादेश एल ॲण्ड टी

कंपनीला माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पामुळे पर्यावरणाला व मत्स्यव्यवसायाला धोका असल्यामुळे पर्यावरणप्रेमी, मच्छिमार आणि काही सेवाभावी संस्थांनी त्याविरोधात मा.न्यायालयात याचिका दाखल केल्यावर मा. न्यायालयाने त्यावर माहे जानेवारी, २०१९ मध्ये प्रकल्पाचे कामाला स्थगिती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने प्रकल्पाच्या कामावरील स्थगिती उठविण्याची मागणी माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये मा.न्यायालयाकडे प्रतिज्ञापत्राद्वारे केली असता स्थगिती तातडीने उठविण्यास मा.न्यायालयाने नकार दिल्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकले नसल्याचे शासनाकडून सांगण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ३ वर्षे होऊनही प्रकल्पाचे काम गेल्या तीन वर्षांपासून जैसे थे स्थितीत असल्यामुळे मा.न्यायालयाने दिलेली स्थगिती उठविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सन २०१६ मध्ये मंबईतील अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवस्मारक प्रकल्पाच्या कामाचे मा.पंतप्रधान यांचे हस्ते जलपूजन करण्यात आले हे खरे आहे. तसेच या प्रकल्पाचे कार्यादेश एल ॲण्ड टी कंपनीला दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ रोजी देण्यात आले.
(२) होय, हे खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका प्रकरणामध्ये दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या सुनावणीवेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरुन सध्या प्रकल्पाचे काम बंद आहे.
(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या दोन विशेष अनुमती याचिका व तद्नंतर नव्याने दाखल झालेली रिट याचिका यांच्या दिनांक ३ मार्च, २०२० रोजीच्या एकत्रित सुनावणीदरम्यान विशेष अनुमती याचिका निकालात काढून, नव्याने दाखल झालेली रिट याचिका मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या मूळ जनहित याचिकांसोबत चालवण्याचे निर्देश दिले.

यापैकी, दोन्ही जनहित याचिका प्रकरणी मा.उच्च न्यायालयात सर्व प्रतिवाद्यांनी प्रतिज्ञापत्रे सादर केलेली असून, रिट याचिकेमधील चार प्रतिवाद्यांपैकी, राज्य शासनाच्या सा.बां.विभाग व मत्स्यव्यवसाय विभाग यांची प्रतिज्ञापत्रे मा.उच्च न्यायालयात सादर झाली असून, उर्वरित प्रतिवाद्यांची प्रतिज्ञापत्रेही मा.उच्च न्यायालयात सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. प्रस्तुत प्रकरणी, मा.उच्च न्यायालयाने सुनावणीची तारीख अद्यापि जारी केलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील चंद्रपूर, गडचिरोलीसह अन्य आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी मिळणेबाबत

**(४०) * १९३०७ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १८६३७ ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली आणि अन्य आदिवासी व नक्षलग्रस्त भागात एकस्तर वेतनश्रेणी सरसकट मिळावी अशी मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सामान्य प्रशासन विभागामार्फत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून समितीने शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाच्या शिफारशींनुसार नक्षलग्रस्त /आदिवासी भागात काम करणाऱ्या मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक/ माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग कनिष्ठ महाविद्यालय व सैनिकी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदर लाभ देण्याबाबतची नियोजित कार्यवाही केव्हा पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चंद्रपूर, गडचिरोली आणि अन्य आदिवासी व नक्षलग्रस्त भागात एकस्तर वेतनश्रेणी सरसकट मिळण्याबाबत शिक्षक भारती संघटना यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. सामान्य प्रशासन विभागाकडे अहवाल प्राप्त झाला असून, सदर अहवाल सामान्य प्रशासन विभागाच्या विचाराधीन आहे.
(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाने आवश्यक तो निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या निर्णयानुसार आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यामधील अन्न महामंडळाच्या गोदामातून प्रयोगशाळेत तपासणीकरीता पाठविण्यात आलेल्या धान्यांच्या नमुन्यांचा अहवाल प्रलंबित असल्याबाबत

**(४१) * १९३६० श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न महामंडळाच्या गोदामातून सन २०२१-२२ मध्ये धान्याचे १३ हजार ११८ नमुने घेण्यात आले असून, त्यापैकी ९५८० नमुने प्रयोगशाळेत तपासणी करीता पाठविण्यात आले असता ३ हजार ५३८

नमुन्यांचा अहवाल प्रलंबित असल्याचे दिनांक ४ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर नमुने तपासणीचे अहवाल प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर अहवाल लवकर प्राप्त होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) सदर प्रश्नाचा विषय भारतीय अन्न महामंडळ यांचेशी संबंधित आहे. भारतीय अन्न महामंडळ हे राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली येत नसून, ते केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते. प्रश्नातील बाब राज्य शासनाशी संबंधित नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कोचिंग क्लासेसमुळे ११ वी व १२ वीच्या वर्गामध्ये विद्यार्थ्यांची पुरेशी उपस्थिती नसल्याबाबत

**(४२) * १९९५७ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड, लातूर, उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) सह संपूर्ण राज्यातील मुले लातूर येथील कोचिंग क्लासेसमध्ये मोठ्या प्रमाणावर IIT/ JEE/ NEET ची तयारी करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशी मुले इयत्ता ११ वी व १२ वीचे प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयात २ वर्षे गैरहजर राहुन लातूर येथे कोचिंग क्लास करतात व त्या मोबदल्यात विद्यार्थ्यांकडून महाविद्यालय भरपूर देणगी घेत असून प्राध्यापकही शासनाकडून भरपुर पगार घेत असतात, परंतु वर्गातील पुरेशा विद्यार्थी संख्येअभावी महाविद्यालयांमध्ये अध्यापनही पुरेसं होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा कोचिंग क्लासेसमुळे गरीब हुशार विद्यार्थ्यांवर अन्याय होत असून त्यांना न्याय देण्यासाठी NEET ची परीक्षा रद्द करुन MH-CET ची अट लागू करण्याची आवश्यकता असून त्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विनियमानुसार इयत्ता १२ वी परिक्षेस बसण्याकरीता विद्यार्थ्यांना किमान ७५ % उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. याबाबत सर्व महाविद्यालयांना सक्त सूचना दिल्या आहेत. तसेच, क्षेत्रिय स्तरावर नियंत्रण ठेवणेसाठी वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत.
(३) संपूर्ण भारत देशातील वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना NEET परीक्षा केंद्र शासनामार्फत अनिवार्य करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या कार्यालयाच्या अखत्यारित येणाऱ्या एज्युकेशनल इन्स्टिट्यूशनल कॅपिटेशन फी ॲक्ट, १९८७ चे उल्लंघन करणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांवर कारवाई करणेबाबत

**(४३) * १८९१४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकरावी प्रवेशाच्या शुल्कासाठी एज्युकेशनल इन्स्टिट्यूशनल कॅपिटेशन फी ॲक्ट, १९८७ लागू असतानाही शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या अखत्यारित असलेल्या मुंबई, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यांतील १०१६ हून अधिक कनिष्ठ महाविद्यालयांकडून सदरहू कायद्याचे सर्रासपणे उल्लंघन केले जात असल्याचे दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यांपैकी अनेक महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेसाठीच्या शुल्कासाठी समानता नसून या महाविद्यालयांकडून अकरावीच्या प्रवेशासाठी सुमारे १५ हजारांपासून ते ८० हजार रुपयांपर्यंतचे शुल्क आकारण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शुल्कासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी तसेच ओबीसी आदी राखीव गटांच्या विद्यार्थ्यांना कोणतीही शुल्कमाफी दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने एज्युकेशनल इन्स्टिट्यूशनल कॅपिटेशन फी ॲक्ट, १९८७ चे उल्लंघन करणाऱ्या शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.
अधिनियमातील तरतुदींनुसार स्वंय-अर्थसहाय्यित शाळा/महाविद्यालयांतील शुल्क तेथील भौतिक सुविधांचा विचार करुन शिक्षक-पालक संघ व कार्यकारी समितीकडून निश्चित केले जाते.
स्वंय-अर्थसहाय्यित शाळा/ महाविद्यालयांमध्ये राखीव गटांना शुल्कमाफ़ी लागू नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात 'आनंदाचा शिधा' योजनेच्या जाहिरातींवर कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असल्याबाबत

**(४४) * १९१०७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुढी पाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त "आनंदाचा शिधा" देण्याची घोषणा शासनाने केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरीब कुटूंबियांना 'आनंदाचा शिधा' योजनेतंर्गत फक्त एक किलो धान्य दिले जात असून त्याच्या जाहिरातींवर शासन कोट्यवधी रुपये खर्च करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, "आनंदाचा शिधा" योजनेतंर्गत देण्यात येणाऱ्या धान्यामुळे गरिबांचे पोटही भरत नाही, तसेच या योजनेंतर्गत गरीब कुटूंबांना १०० रुपयांत गोडेतेल, रवा, चनाडाळ, साखर मिळणार होती परंतु एकाही स्वस्त धान्य दुकानावर अद्यापही आनंद शिधा योजनेंतर्गत धान्य पोहचलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजनेंतर्गत मिळणारे धान्य स्वस्त धान्य दुकानांना वेळेत देण्याबाबत तसेच या योजनेंतर्गत जाहिरातींवर करण्यात येणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

पात्र शिधापत्रिकाधारकांना गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, इत्यादी सणांनिमित्त प्रत्येकी १ किलो या परिमाणात रवा, चणाडाळ, साखर व १ लिटर खाद्यतेल हे शिधाजिन्नस समाविष्ट असलेला आनंदाचा शिधा वितरीत करण्यात आला आहे.

राज्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ सुनिश्चित करण्याकरीता, या योजनेबाबतची जनजागृती करण्यासाठी एकूण रू.४०,२५,९०६/- (अक्षरी रूपये चाळीस लाख पंचवीस हजार नऊशे सहा फक्त) एवढा खर्च झालेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना मंजूर करण्यात आलेल्या एकूण १,५८,९७,५७८ इतक्या शिधाजिन्नस संचांपैकी १,५७,७३,७२८ इतक्या शिधाजिन्नस संचांचे (सुमारे ९९.२२%) पात्र लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुंबईसह अनेक खाजगी शाळांच्या प्रशासनाकडून फी न भरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका दिल्या नसल्याबाबत

**(४५)** * **१९०१२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईसह अनेक खाजगी शाळांच्या प्रशासनाकडून फी न भरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका आणि इतर आवश्यक कागदपत्रे दिली जात नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची दखल घेत बालहक्क आयोगाने शिक्षण विभागास धोरण तयार करण्याच्या सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत मुंबईतील १५ शाळांना नोटीसा बजाविण्यात आल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणी धोरण तयार करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) खाजगी शाळांमधील प्रशासनाकडुन फी न भरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रक व इतर कागदपत्र दिली जात नसल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचा दाखला व गुणपत्रक देण्याबाबत तसेच कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचीत राहणार नाही याची दक्षता घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. भविष्यात असे प्रकार होणार नाहीत याबाबत दक्षता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## प्राथमिक शिक्षक भरतीमध्ये खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४० टक्के जागा राखीव ठेवण्याबाबत

**(४६) * १९१६२ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अरुण लाड, प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रिक्त प्राथमिक शिक्षक भरती पवित्र पोर्टलद्वारे करण्याची घोषणा राज्य सरकारने केली असून बिंदू नामावलीमध्ये झालेल्या घसरणीमुळे खुल्या वर्गातील थेट पात्र विद्यार्थ्यांना त्याचा फटका बसणार असल्याने १५३०० जागापैकी जेमतेम १६०० जागा खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणार असल्याने ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गासाठी १० टक्के व खुल्या प्रवर्गासाठी ४० टक्के जागा राखीव ठेवण्याची मागणी जनतेतून होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभियोग्यता आणि बुध्दीमापन चाचणीचा निकाल जाहीर होऊनही प्रत्यक्ष भरतीप्रक्रिया सुरु झालेली नाही, त्यामुळे भरतीसाठी पात्र उमेदवारांमध्ये असंतोषाचे तसेच नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या जवळपास ६७ हजार जागा रिक्त असल्याने शैक्षणिक दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत असतानाही गेली अनेक वर्ष भरती प्रक्रिया बंद असल्याने अनेक शाळा शिक्षकांविना आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भरती प्रक्रियेला गती देऊन रिक्त जागांपैकी किमान ८० टक्के जागा भरण्याचा निर्णय शासनाने घेतला मात्र बिंदू नामावलीमुळे भरती प्रक्रिया लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण होत आहे, हे

ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भरती करण्यात येणाऱ्या एकूण जागांची संख्या पाहता, खुल्या प्रवर्गासाठी फारच कमी प्रमाणात जागा येत असल्यामुळे खुल्या प्रवर्गासाठी प्रचलित नियमांनुसार शासनाने ४० टक्के जागा राखीव ठेवाव्यात अशी मागणी खुल्या प्रवर्गातील उमेदवार तसेच खुल्या प्रवर्ग संघर्ष समिती, परभणी यांचे मार्फत शासनाकडे त्याचदरम्यान करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केलेल्या मागणीवर निर्णय घेवून शिक्षक भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

काही संघटनांनी खुल्या प्रवर्गासाठी ३८ टक्के व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी १० टक्के जागा राखीव ठेवण्याची मागणी केली आहे.

(२), (३) व (४) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील एकूण ६५,१११ इतकी शिक्षकीय पदे रिक्त आहेत.

शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कार्यरत शिक्षकांकडून आवश्यक अध्यापनाचे कामकाज पूर्ण करुन घेण्यात येत आहे.

न्यायालयीन प्रकरण व बिंदुनामावली अद्ययावत करण्यासाठी लागणारा वेळ विचारात घेऊन शासन पत्र दिनांक ०७/०७/२०२३ अन्वये सेवानिवृत्त शिक्षकांमधून शिक्षक उपलब्ध करून देणेबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(५) होय, हे खरे आहे.

(६) सन २०१७ च्या बिंदुनामावलीच्या १० जिल्ह्यांची चौकशी समितीमार्फत तपासणी करण्यात आली होती. त्यावेळी खुल्या प्रवर्गातील बिंदुमध्ये तफावत आढळून आली. त्यावेळी तपासणीसाठी घेतलेले मुद्दे विचारात घेऊन आता सन २०२३ मध्ये बिंदुनामावली तपासताना सदर बाबी विचारात घेऊन, बिंदुनामावलीची तपासणी व्यवस्थित करावी, अशा सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रस्ते, इमारत बांधकाम व पुलांच्या देखभाल दुरुस्ती आणि पायाभूत सुविधांसाठी महामंडळ स्थापन्यास शासनाच्या विविध विभागांनी विरोध केल्याबाबत

**(४७) * १९०५९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या रस्ते, इमारत बांधकाम व पुलांच्या देखभाल दुरुस्ती आणि पायाभूत सुविधांसाठी” महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास

महामंडळाच्या"स्थापनेस वित्त, नियोजन, महसूल आणि परिवहन या विभागांनी आक्षेप नोंदवून विरोध दर्शविलेला असतानाही महामंडळाच्या स्थापनेला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असल्याचे माहे मे, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन्ही बाजूच्या सुधारणा केलेल्या रस्त्याच्या जागेतून सेवावाहिनीपासून मिळणारे भुईभाडे, रस्त्याच्या २०० मी. अंतरावर वृद्धी शुल्क, जाहिरात शुल्क, मालमत्तांचे निश्चलनीकरण, गौण खनिज अतिरिक्त अधिभार, मोटार वाहन शुल्कावर अतिरिक्त अधिभार, राज्य व प्रमुख जिल्हा मार्गाच्या ५०० मीटरच्या अंतरापर्यंत जमिनीची खरेदी-विक्री व्यवहारांवर अतिरिक्त अधिभार आणि कर्जाच्या माध्यमातून निधी उभारण्याची महामंडळाची योजना असून यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन सदरच्या प्रस्तावावर काय निर्णय घेण्यात आला आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने फेर निर्णय घेऊन पायाभुत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याबाबतचा निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) "महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ" स्थापनेबाबतच्या प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने दिनांक ०३/०५/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली असून याबाबतचा शासन निर्णय दिनांक २२/०५/२०२३ रोजी निर्गमित केला आहे.
(२) राज्यातील सुधारणा केलेल्या व आर्थिक दृष्टया सुसाध्य तसेच विभागाकडील रस्त्यांच्या जागेतून जाणाऱ्या सेवावाहिनी पासून मिळणारे भुईभाडे, विभागाच्या रस्त्यापासून देण्यात येणाऱ्या जोडरस्त्यांच्या परवानग्या यावर आकारण्यात येणारे शुल्क, विभागाच्या मालकीच्या रस्त्यांच्या व इतर जागांवर जाहिरातींच्या हक्काच्या बदल्यात भुईभाडे आकारणे, विभागाच्या मालकीच्या जागांचे निश्चलीकरण करुन निधी उभारणे, कर्ज स्वरुपात निधी उभारणे, या व अशा विविध स्त्रोतांद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निधीचे संकलन करण्याचे नियोजन आहे.

तसेच मूळ गौण खनिजावर अतिरिक्त अधिभार लावणे, सुधारणा केलेल्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूच्या २०० मी.अंतरापर्यंतच्या जागांवर वृध्दीशुल्क लावणे, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्गाच्या मध्यापासून दोन्ही बाजूस ५०० मी अंतरापर्यंत किंवा वेळोवेळी नामनिर्देशित केल्यानुसार अंतराप्रमाणे असलेल्या जमिनीच्या खरेदी विक्री व्यवहारांवर अतिरिक्त मुद्रांक शुल्क आकारणे व मोटार वाहन शुल्हावर अतिरिक्त अधिभार लावणे याबाबत संबंधित विभागांशी विचारविनिमय करुन कार्यपध्दती निश्चित करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) व (५) रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ.विविध पायाभूत सुविधा विकास क्षेत्रातील प्रकल्प राबविणे व त्यासाठी विविध स्त्रोतांद्वारे निधी उभारणे या प्रयोजनासाठी "महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची" स्थापना करण्यात आलेली आहे. सदर महामंडळाची कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये नोंदणी करण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे.

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत

**(४८) * १९८९० श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत शासकीय ठराव मंजूर करून तो केंद्र शासनाकडे पाठवण्यात आला असून दिनांक १ मे,२०२३ रोजी महाराष्ट्र दिनाबरोबरच मराठी राजभाषा दिन साजरा केला जात असल्याने यादिवशी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करावा व यासाठी राज्य शासनाने पाठपुरावा करावा, अशी मागणी विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी शासनाकडे त्यांच्या दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रान्वये केली आहे आहे हे, खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र सरकारने प्रा.रंगनाथ पाठारे समितीचा पाठविलेला अहवाल केंद्र सरकारने स्वीकारला असून केंद्र सरकारच्या सर्व विभागांनी सकारात्मक अहवाल दिला असून त्यांच्या दिनांक २० ऑक्टोबर,२०२० रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव अन्य मंत्रालये व साहित्य अकादमीच्या भाषा तज्ज्ञ समितीमार्फत विचाराधीन असल्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.केंद्रीय सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री यांनी एक वर्षापासून संसदेत "लवकरच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत निर्णय घेतला जाईल, यावर सध्या आंतरमंत्रालयीन विचार सुरु आहे", असे सांगितल्यानंतर एक वर्षाचा कालावधी उलटूनही अभिजात भाषेसाठीचे सर्व निकष मराठी भाषा पूर्ण करीत असतानाही केंद्र सरकारकडून महाराष्ट्राच्या या न्याय्य मागणीकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठी भाषा विकासासाठी काम करणाऱ्या चार संस्थांची कार्यालये एकाच ठिकाणी आणून मुंबईत मराठी भाषा भवन उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(५)असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू प्रस्तावास केंद्र शासनाकडून जलदगतीने मान्यता मिळण्यासाठी तसेच मराठी भाषा भवनाची उभारणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव अन्य मंत्रालये व साहित्य अकादमीच्या भाषा तज्ज्ञ समितीमार्फत विचाराधीन असल्याचे कळविले आहे.
(३) केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा राज्य शासनाचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालयाच्या विचाराधीन असून त्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे दिनांक ०३/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा मूळ अहवाल दिनांक १२/०७/२०१३ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविला आहे. तद्नंतर याप्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मराठी भाषा, मा.मुख्य

सचिव व सचिव, मराठी भाषा यांच्या स्तरावरुन केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

गिरगांव महसूली विभागातील भूकर क्र.१७३६ वरील मराठी भाषा विभाग व शालेय शिक्षण विभागाकडील भूखंड यांचे एकत्रीकरण करुन मराठी भाषा भवन ही संयुक्त भव्य इमारत उभारण्यात येणार आहे. मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सदर इमारतीच्या सुधारीत आराखड्यांना सहमती मिळाली आहे. सद्य:स्थितीत इमारतीच्या बांधकाम खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव शिक्षक पदांना मान्यता देण्याबाबत

**(४९) * १९४१४ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सत्यजीत तांबे, श्री.किरण सरनाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक १७२३६ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यभार वाढल्याने नव्याने तयार होणाऱ्या वाढीव पदांचा प्रस्ताव पद निर्माण होणाऱ्या वर्षीच ३१ ऑक्टोबर पर्यंत वित्तीय मान्यतेसाठी शासनापुढे सादर करणेबाबत दिनांक २६ मार्च,२००२ चा शासन निर्णय असूनही कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव पदांचा प्रस्ताव पद निर्माण होणाऱ्या वर्षीच सादर होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३-०४ ते २०१८-१९ अखेरच्या वाढीव (प्रस्तावित) शिक्षक पदांना मागील दीड दशकापासून मंजुरी मिळालेली नाही, यामुळे अनुदानित तुकड्यांवर पूर्ण कार्यभारावर काम करूनही त्यांना पूर्ण वेतन मिळत नसल्याने अशा शिक्षकांच्या मानसिकतेवर व शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने शिक्षकांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांचेवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास १ मार्च, २०१४ रोजी उच्चस्तरीय सचिव समितीने १००० कनिष्ठ महाविद्यालय वाढीव पदांना मान्यता दिली असे असताना फक्त ९३५ पदांना मान्यता देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. उच्चस्तरीय समितीने मान्यता देऊनही उर्वरित ६५ वाढीव पदांचा प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून नजरचुकीने उशिरा प्रस्तावित केल्याने, ह्या ६५ पदांना शिक्षण विभागाने अद्याप मान्यता दिली नाही. याबाबत उपसंचालक स्तरावर पुन्हा पडताळणी केली असता ५३ पदांना आजदेखील पूर्ण कार्यभार असून ह्या पदांची माहिती शिक्षण विभागास प्राप्त झाली असणे व असे असूनही ह्या ५३ पदांवरील कार्यरत शिक्षकांना मान्यता व वेतन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये दरवर्षी कार्यभार वाढल्यामुळे निर्माण होणारी वाढीव पदे मंजूर करण्याबाबत वाढीव पदांचा प्रस्ताव तसेच व्यपगत झालेल्या वाढीव पदांना पुन्हा मान्यता देण्याबाबत सर्व तपासण्या करुन सन २००३ ते २०१९ पर्यंतच्या १२९५ पदांचा प्रस्ताव मा.शिक्षण संचालक कार्यालयाने सप्टेंबर २०२१ मध्ये शासनास सादर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हानिहाय कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव पदांची संख्या किती आहे, तसेच

सन २००३-०४ ते २०१८-१९ अखेरच्या वाढीव (प्रस्तावित) शिक्षक पदांना सरसकट तातडीने मंजुरी प्रदान करून त्यांना नियुक्ती दिनांकापासून पूर्ण वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३), (४) व (५) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयामधील व्यपगत करण्यात आलेल्या वाढीव पदांना पुनर्जिवित करण्यास वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने शालेय शिक्षण विभागाकडून शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कार्यभार वाढल्यामुळे निर्माण होणाऱ्या उर्वरित वाढीव पदांवरील नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांच्या यादीसह सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा बंद न करण्याबाबत

**(५०) * १९२०५ श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १८३९८ ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळांचे जवळच्या शाळांत समायोजन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील अनेक भागांतील विद्यार्थ्यांना शाळेसाठी एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी जावे लागणार आहे, तसेच पटसंख्येच्या नावावर शासनाने पाच हजार शाळांचे इतर शाळांत समायोजन करुन शाळा बंद करु नये अशी मागणी पालकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कमी पटसंख्येपेक्षा असलेल्या जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांमध्ये सद्य:स्थितीत दोन नियमित शिक्षक कार्यरत आहेत, त्यापैकी एका नियमित शिक्षकाची बदली जास्त पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये करून त्याजागी सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकाची कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद न करण्याबाबत तसेच आयुक्तांनी शासनास पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे आहे.
(४) सदर प्रस्ताव विचाराधिन आहे. तथापि, या प्रस्तावात कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचे प्रस्तावित नाही. त्यामुळे कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा कोणताही विचार नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## गोंडवाना विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयांना विविध प्रकारचे शुल्क भरतांना वस्तू व सेवा कर भरण्याबाबत परिपत्रक काढल्याबाबत

**(५१) * १९५२७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवी कर प्रणालीमध्ये सुधारणा करताना शासनाने नवी कर प्रणाली वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू केली त्यावेळेस केंद्रीय मंत्रालयाने शिक्षण क्षेत्राचा यात समावेश करणार नाही असे स्पष्ट केले असतानाही, गोंडवाना विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयांना विविध प्रकारचे शुल्क भरताना १८% वस्तू व सेवा कर (जीएसटी) भरावा लागणार असे परिपत्रक काढले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय मंत्रालयाने नविन करप्रणाली वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू करताना शिक्षण क्षेत्राचा समावेश करण्यात येणार नाही असे स्पष्ट केले असतानाही सदर परिपत्रक काढण्याची कारणे काय,
(३) असल्यास, केंद्र सरकारने नविन करप्रणालीमधून शिक्षण क्षेत्राला वगळले असतानाही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही यापुढे परिक्षेसह विविध शुल्क भरतांना वस्तू व सेवा कर दयावा लागणार असून, विद्यार्थ्यांच्या फी व इतर शुल्कापोटी पालकांना मोठा आर्थिक फटका बसणार असल्याने विद्यार्थी व पालकांकडून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्रालयाने शिक्षण क्षेत्राचा समावेश करणार नसल्याचे स्पष्ट केले असतानाही अशा प्रकारे परिपत्रक काढणाऱ्या गोंडवाना विद्यापीठाच्या प्रशासनावर कोणती कारवाई केली तसेच सदर शिक्षण क्षेत्रास १८% वस्तू व सेवा कर (जीएसटी) रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संस्था व महाविद्यालयांकडून संलग्नता संदर्भात विद्यापीठाकडे जमा झालेल्या शुल्क रक्कमेवरील १८ टक्के जीएसटी रक्कम रुपये ५१,९५,७९४/- त्यावरील व्याज व दंडासहचा भरणा करण्याबाबत वस्तु व सेवा कर (जीएसटी) विभागाने विद्यापीठास कळविले होते. त्यामुळे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दिनांक २२/०२/२०२३ रोजीच्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून संलग्नता शिर्षातून प्राप्त होणाऱ्या शुल्कावर १८ टक्के जीएसटी आकारण्यात येत असल्याचे परिपत्रक विद्यापीठाने निर्गमित केले आहे.

(३) हे खरे नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे शीर्षातील शुल्क हे संस्था व महाविद्यालय यांचे संलग्नता शुल्कासंदर्भात असून ते संस्था व महाविद्यालयांना भरावयाचे आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांवर त्याचा कोणताही भुर्दंड बसणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर, बोदवड, रावेर, (जि.जळगांव) येथील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रिक्त पदे भरण्याबाबत

**(५२) * २०१३३ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर, बोदवड, रावेर, (जि.जळगांव) येथील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उप विभागीय अभियंता, सहाय्यक अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ लिपिक अशी अनेक पदे रिक्त असल्याने नागरीकांना त्यांचे कामास तसेच प्रशासनास जनतेची कामे करण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शाासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर, बोदवड व रावेर उप विभागांमध्ये उप अभियंता संवर्गामधील ३ मंजूर पदांपैकी १ पद, सहायक अभियंता श्रेणी-२/शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता या एकत्रित संवर्गामधील १३ मंजूर पदांपैकी ३ पदे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गामधील १४ मंजूर पदांपैकी ११ पदे आणि कनिष्ठ लिपिक संवर्गातील ६ मंजूर पदांपैकी १ पद रिक्त आहे.

(२) रिक्त पदे भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :- (अ) उप अभियंता संवर्गातील पद बदली/पदोन्नतीद्वारे अथवा सहायक अभियंता श्रेणी-१ संवर्गातून सरळसेवेद्वारे नियुक्त करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(ब) सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गाची पदे सरळसेवेद्वारे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

(क) कनिष्ठ अभियंता संवर्गातील पद भरतीची प्रक्रिया सुरू केलेली आहे.

(ड) कनिष्ठ लिपिक संवर्गातील पद भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्वच शासकीय विभागांची, तसेच महामंडळांची संकेतस्थळे मराठीत करण्याबाबत

**(५३)** * **१८९४० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार 'मराठी' ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली असल्याने सरकारी व्यवहारांमध्ये मराठीचा वापर होणे अपेक्षित असतानाही राज्यातील अनेक विभागांची, तसेच महामंडळांची संकेतस्थळे अद्यापही इंग्रजीत असल्याचे दिनांक २ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पडताळणी केली आहे काय, पडताळणीत काय आढळून आले आहे आणि राज्यातील सर्वच शासकीय विभागांची तसेच महामंडळांची संकेतस्थळे मराठीत करण्याबाबत तसेच त्यावर मराठीचा पर्याय सर्वप्रथम दिसण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार "मराठी" ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली असल्याने सरकारी व्यवहारांमध्ये मराठीचा वापर होणे अपेक्षित असतानाही राज्यातील अनेक विभागांची, तसेच महामंडळांची संकेतस्थळे अद्यापही इंग्रजीत असल्याचे पत्र अथवा निवेदन दिनांक २ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झालेले आढळून आले नाही. तथापि, राज्यातील अनेक विभागांची, तसेच महामंडळांची संकेतस्थळे इंग्रजीत असल्याबाबत "आपले सरकार" तक्रार प्रणालीवर तसेच ई-मेल द्वारे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) उक्त प्रकरणी शासनाने पडताळणी केली असून काही विभाग व कार्यालये यांची संकेतस्थळे इंग्रजी भाषेत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयातील संकेतस्थळावर मराठी भाषेत माहिती उपलब्ध करण्याच्या सूचना या विभागाच्या दिनांक २९/०१/२०१३ व दिनांक २७/०१/२०१७ व दिनांक ०७/०५/२०१८ च्या परिपत्रकान्वये तसेच वेळोवेळी पत्र व अर्धशासकीय पत्र संबंधिताना पाठवून देखील देण्यात आलेल्या आहेत.

तसेच महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ च्या कलम ३ (आय) मधील तरतुदीनुसार राज्यशासनाच्या कोणत्याही कार्यालयाने संकेतस्थळावर द्यावयाची माहिती राजभाषा मराठीमध्ये देणे बंधनकारक करण्यात आले आहे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुण्यातील हॉटेल्स व रेस्टॉरंटमध्ये जेवण किंवा खादयपदार्थ अन्न सुरक्षा प्रशासनाच्या नियम व मानांकनांनुसार बनविण्यात येत नसल्याबाबत

**(५४)** * **१८९७८ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील हॉटेल्स व रेस्टाँरंटसारख्या बहुतांश ठिकाणी जेवणातील विविध मेन्यूसह समोसा, वडा, कचोरीसारखे विविध खादयपदार्थ किंवा जेवण अन्न सुरक्षा प्रशासनाच्या नियम व मानांकनांनुसार बनविण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समोसा, वडा, कचोरीसारख्या खादयपदार्थांची अन्न सुरक्षा प्रशासनाकडून तपासणी होत नसल्याने अशा ठिकाणचे खादयपदार्थ खाणाऱ्या ग्राहकांच्या जिवीतास धोका होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने हॉटेल्स व रेस्टाँरंटमधील जेवणातील खादयपदार्थांची तपासणी न होण्यामागची कारणे काय आहेत, तसेच सदर खाद्यपदार्थांची तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१), (२) व (३) अन्न व औषध प्रशासनाने माहे फेब्रुवारी-मार्च २०२३ दरम्यान हॉटेल व रेस्टॉरंट यांच्या राबविलेल्या विशेष मोहिमेत हॉटेलमध्ये बनविलेल्या विविध अन्नपदार्थांचे एकूण ७१ नमुने घेण्यात आले आहेत. त्यापैकी ४३ नमुने प्रमाणित आले असून, ०१ नमुना अप्रमाणित आहे. तसेच ०१ नमुना लेबलदोषाचा आहे. उर्वरित २६ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

अन्न व औषध प्रशासनाने सन २०२२-२०२३ दरम्यान हॉटेल व रेस्टॉरंट यांच्या राबविलेल्या मोहिमेत एकूण ९१ नमुने घेण्यात आले आहेत. त्यापैकी ६७ नमुने प्रमाणित असून, ०२ नमुने कमी दर्जाचे, ०५ नमुने लेबलदोषाचे आहेत. उर्वरित १७ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

अन्न व औषध प्रशासनाकडून संपूर्ण राज्यात वेळोवेळी विशेष मोहिमा राबविल्या जातात. तपासण्यांमध्ये भेसळयुक्त अन्न आढळून आल्यास अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ व नियम २०११ मधील तरतुदीनुसार संबंधितांवर कारवाया केल्या जातात.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील वाळूंज एमआयडीसी क्षेत्राबाहेरील लघु व सुक्ष्म उद्योगांना मूलभूत सुविधा व भुखंड उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५५) * २०२८१ श्री.अंबादास दानवे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १७११० ला दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वाळूंज एमआयडीसी क्षेत्रामध्ये लघु व सुक्ष्म उद्योगांनी अर्ज करुनही भुखंड मिळाले नसल्याने खासगी भुखंड विकत घेवून उद्योग उभारलेल्या सुमारे तीन हजार उद्योजकांमुळे सुमारे ७५००० कामगारांना रोजगार उपलब्ध होत असून कोट्यावधी रुपयांचा कर भरुनही उद्योजकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नसल्याने उद्योजकांमध्ये नाराजी असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९० च्या दशकात आशिया खंडातील सर्वात वेगाने विकसित झालेले औद्योगिक शहर म्हणून औरंगाबादची ओळख असतानाही या एमआयडीसी बाहेरील लघुउद्योगांना एमआयडीसी कडून रस्ते, वीज आणि पाणी अशी कोणतीही सुविधा दिली जात नसल्याने एमआयडीसीबाहेरील उद्योगांचे प्रश्न मसिआ संघटनेने मा.उद्योग मंत्री यांच्याकडे मांडले असता त्यांनी सदर प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिल्ली - मुंबई औद्योगिक मार्गिके अंतर्गत सदरहू लघू उद्योगांसाठी भूखंड देण्याचे मा.उद्योग मंत्री यांनी घोषणा केली आहे, परंतु भुखंडाचे दर खूप जास्त असल्याने सदरहू दर लघु उद्योजकांना परवडणारे नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने मा.उद्योग मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदरहू उद्योगांना मूलभूत सुविधा देण्याबाबत तसेच दिल्ली - मुंबई औद्योगिक मार्गिके अंतर्गत सदरहू लघू उद्योगांसाठी सवलतीच्या दरात भुखंड उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) वाळूंज औद्योगिक क्षेत्र सन- १९८४ रोजी स्थापन करण्यात आले आहे. सदर औद्योगिक क्षेत्रातील सर्व औद्योगिक, व्यापारी भूखंडाचे वाटप करण्यात आले असून, सद्य:स्थितीत उद्योगासाठी जागा वाटपासाठी उपलब्ध नाही. वाळूंज औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना मऔवि महामंडळातर्फे सर्व पायाभूत/ मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सहकारी औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांना औद्योगिक पायाभूत निधी (Critical Infrastructure Fund) अंतर्गत पायाभूत सुविधा योजनेच्या निकषानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार पुरविल्या जातात.

(३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्यादित (MITL) शेंद्रा बिडकीन येथे लघु उद्योगासाठी भूखंडाचे आरेखन केले आहेत. त्यापैकी १२३ भूखंड लघु उद्योजकांना वाटप करण्यात आले आहे. दिल्ली- मुंबई औद्योगिक मार्गिका क्षेत्रामध्ये भूखंडांचे प्रचलित दर जास्त असल्याबाबत कोणतीही तक्रार MITL कडे प्राप्त नाही.

लघु उद्योगासाठी दरमहा भूखंडांची नियमित मागणी लघु उद्योजकांकडून होत आहे. लघु उद्योजकांकडून प्रचलित दराने भूखंडाची मागणी होत असल्याने सवलतीच्या दराने भूखंड देण्याची बाब उद्‍भवली नाही

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पैठण ते औरंगाबाद या मुख्य शहरांना जोडणाऱ्या राज्य मार्गाच्या कामास शासनाने मंजुरी दिल्याबाबत

**(५६) * १९८४१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण ते औरंगाबाद या दोन महत्वाच्या शहरांना व महत्वाच्या औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्राला पुरक ठरणाऱ्या राज्य मार्गाच्या चौपदरीकरण करण्याच्या कामाला शासनाने मंजूरी दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे DPR तयार करण्याचे काम सुरु असून, अतिरिक्त भुसंपादन न करता अस्तित्वातील ३० मिटर जागेत चौपदरीकरण करण्याच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तांत्रिक सल्लागारामार्फत तयार करण्याचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पैठण ते औरंगाबाद रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर रस्त्याच्या कामाचे स्वरुप काय आहे व सदरहू काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) होय.

पैठण ते औरंगाबाद या महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

सदर रस्त्याचे सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाले असून यामध्ये अतिरिक्त भूसंपादन न करता अस्तित्वातील ३० मीटर जागेत चौपदरीकरण करण्याचे काम प्रस्तावित आहे.
(३) केंद्र शासनाकडून सदर महामार्गाचे कामास माहे जानेवारी, २०२३ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे व करारनाम्यानुसार काम पूर्णत्वाचा कालावधी कार्यारंभ दिनांकापासून १८ महिन्याचा आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष विधी अभ्यासक्रमाच्या एका विषयाच्या परीक्षेत विषय कोड आणि पेपर कोड चुकीचा छापण्यात आला असल्याबाबत

**(५७) * १९१२६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष विधी अभ्यासक्रमाच्या 'अल्टरनेटिव्ह डिस्प्युट रिसोल्युशन सिस्टीम' या विषयाच्या दिनांक ४ मे, २०२३ रोजी पार पडलेल्या परीक्षेत विद्यापीठ प्रशासनाकडून विषय कोड आणि पेपर कोड चुकीचा छापल्याने सदरहू विषयाच्या पेपर तपासणीदरम्यान गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तृतीय वर्ष विधी शाखेच्या (पाच वर्षाचा अभ्यासक्रम) पाचव्या सत्राच्या निकालापासून विविध महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागले असल्याचे माहे मे, २०२३ च्या चौथ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाकडून विषय कोड आणि पेपर कोड चुकीचा छापणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच पाचव्या सत्राच्या निकालापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष विधी अभ्यासक्रमाच्या "अल्टरनेटिव्ह डिस्प्युट रिसोल्युशन सिस्टीम" या विषयाची परीक्षा दिनांक ३ मे, २०२३ रोजी पार पाडली असून प्रचलित पध्दतीनुसार वेळापत्रकावर प्रत्येक विषयासाठी विषय संकेतांक क्रमांक कायमस्वरुपी असतात व प्रत्येक विषयासाठी प्रश्नपत्रिका सांकेतांक क्रमांक हा वेगळा असतो. प्रश्नपत्रिका विभागाकडून प्रश्नपत्रिकेवर दोन्ही क्रमांक तसेच विषयांचे पूर्ण नाव दिले जात असल्यामुळे गोधळ निर्माण होण्याची शक्यता नाही. या संदर्भात प्रश्नपत्रिका विभागाकडे तक्रार आल्याचे दिसून येत नाही.

तृतीय वर्ष विधी शाखेच्या पाचव्या सत्राचा निकाल दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी लागला असून निकालापासून महाविद्यालयातील एकाही विद्यार्थ्याला वंचित रहावे लागले नाही.

पाचव्या सत्राच्या निकालातील अनुत्तीर्ण विद्यार्थांची उन्हाळी सत्राची परीक्षा दिनांक २५ मे, २०२३ पासून सुरु होऊन पार पडली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महिला उद्योजकांचे प्रमाण वाढविण्याबाबत

**(५८) * १९०७७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला संचालित उद्योगाचे प्रमाण जवळपास ९ टक्के असून महिला उद्योजकांचे प्रमाण वाढविण्याकरीता जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून एकूण कर्जावर २५ टक्के भांडवली सवलत रोख स्वरूपात देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेनुसार एकल मालकी भागीदारीद्वारे सहकारी क्षेत्र, खाजगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक, स्वयंसहायता बचत गट यांना हे लाभ दिले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेनुसार नागपूर विभागांतर्गत सहा जिल्ह्यांमध्ये एकूण किती महिलांना किती कोटी रूपये रोख सवलत देण्यात आली, तसेच या योजनेत वाढ करण्यासाठी सन २०२३-२४ या अंदाजपत्रकामध्ये किती कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

एकल मालकी, भागीदारी, सहकारी क्षेत्र, खाजगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक यांना याचा लाभ दिला जातो.

(३) नागपूर विभागात महिला उद्योजकांना सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत ५० लाखाच्या कमाल मर्यादेत स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या २५% दराने ५ समान हप्त्यामध्ये भांडवली अनुदान देण्यात येते. मुख्यमंत्री

रोजगार निर्मीती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रम अंतर्गत एकूण प्रकल्प किंमतीवर २५ ते ३५ % अनुदान देण्यात येते.

महिला उद्योजकांच्या धोरणांतर्गत नागपूर विभागात १२८ घटकांना रुपये ४३.०१ कोटींचा लाभ देण्यात आला आहे. त्याप्रमाणे नागपूर विभागात मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रम अंतर्गत अनुक्रमे ६०३ महिला उद्योजकांना रुपये २२.०१ कोटी व ७१३ महिला उद्योजकांना एकूण रुपये २१.८३ कोटी अनुदान वितरित करण्यात आले आहे. अश्या प्रकारे नागपूर विभागाअंतर्गत एकूण सहा जिल्हयांमध्ये १२८ महिला उद्योजकांना रुपये ४३.०१ कोटी अनुदान देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे बीएड सीईटी परीक्षेदरम्यान सर्वच परीक्षा केंद्रांवर तांत्रिक अडचणी आल्याने कंत्राटदार कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(५९) * १९८९२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे बीएड सीईटी परीक्षेदरम्यान परीक्षा आयोजकांच्या हलगर्जीपणामुळे परीक्षेला गेलेल्या विद्यार्थ्यांना ऐनवेळी परीक्षा केंद्रात बदल झाल्याचे सांगण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीएड सीईटी परीक्षेचे नियोजन देण्यात आलेल्या कंपनीच्या सर्वच परीक्षा केंद्रांवर तांत्रिक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले असून, संबंधित कंत्राटदार कंपनीवर कारवाई करावी, अशी मागणी विविध संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी कली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदरील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच सदर कंत्राटदार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) नाशिक जिल्ह्यातील एकूण पाच परीक्षा केंद्रापैकी दोन परीक्षा केंद्रांवर तात्रिंक अडचण निर्माण झाल्याने असे दोन परीक्षाकेंद्र परीक्षेच्या दोन दिवस आधी बदलण्यात आले.

(२) हे खरे नाही.

(३) बदल करण्यात आलेल्या परीक्षा केंद्राबाबत उमेदवारांना प्रत्यक्ष फोन करुन व एस.एम.एस.व्दारे अवगत करण्यात आले. मूळ परीक्षाकेंद्रावर उपस्थित असलेल्या उमेदवारांना बदल झालेल्या परीक्षाकेंद्रात जाण्यासाठी सेवापुरवठादारामार्फत व्यवस्था करण्यात आली तसेच उशीराने पोहचलेल्या उमेदवारांना परीक्षेचा वेळ वाढवून देण्यात आला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी उपयोजन क्षेत्रातील शाळा / तुकडीवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदानाअभावी नियमित होत नसल्याबाबत

**(६०) * २०३०४ श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उपयोजन क्षेत्रातील (लेखाशीर्ष १९०१) शाळा/तुकडीवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदानाअभावी नियमित नसल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळत नसल्याने शाळा/ तुकड्यांचे आदिवासी उपयोजन क्षेत्रातून बिगर आदिवासी उपयोजन क्षेत्रामध्ये रूपांतर करून नियमित वेतन अनुदान मंजूर करण्यात यावे, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळा/तुकड्यांचे आदिवासी उपयोजन क्षेत्रातून बिगर आदिवासी उपयोजन क्षेत्रामध्ये रूपांतर करून नियमित वेतन अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) शालेय शिक्षण व क्रीडा विभागास आदिवासी क्षेत्रातील माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळांच्या आदिवासी तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतनासाठी आदिवासी विकास विभागाकडून २२०२१९०१ या लेखाशीर्षाखाली आर्थिक तरतुद उपलब्ध करून दिली जाते. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात विभागाच्या मागणीपेक्षा आदिवासी विकास विभागाकडून सदर लेखाशीर्षाखाली अल्पशी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. सदर लेखाशीर्षाखाली आदिवासी विकास विभागाने जून, २०२३ अखेर मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ३४ टक्के इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत केला आहे. त्यानुसार सदर लेखाशीर्षाखाली उपलब्ध तरतुदीमधून वेतन अदा करण्यात आलेले आहे.

वित्त विभागाच्या दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ नूसार आदिवासी उप योजना राबविणाऱ्या ज्या आस्थापना आहेत, त्याचेसाठी उपलब्ध होणारा निधी हा कार्यक्रमांवरील खर्चाकडे वर्ग करण्यात येईल असे निदेश देण्यात आले असल्यामुळे सदर लेखाशीर्ष अनिवार्य खर्चात समाविष्ट करता येत नाही. तथापि, विभागाकडून सदरचा प्रस्ताव आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग यांचेमार्फत वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला असता, वित्त विभागाकडून सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

-----------------

# चर्नी रोड (मुंबई) येथील सावित्रीबाई फुले महिला वसतिगृहातील मुलीवर अत्याचार करुन हत्या केल्याच्या घटनेची चौकशी करण्याबाबत

**(६१) * २०२७२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चर्नी रोड (मुंबई) येथील सावित्रीबाई फुले महिला वसतिगृहात कर्तव्यावर असणाऱ्या सुरक्षारक्षकानेच वसतिगृहातील मुलीवर अत्याचार करुन तीची हत्या करुन स्वतः आत्महत्या केल्याची बाब दिनांक ०७ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वसतिगृहाची क्षमता ४५० विद्यार्थीनींची असून सध्या या वसतिगृहात ४० ते ४५ विद्यार्थीनीच वास्तव्यास असून गेल्या वर्षभरापासून तेथील सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्याचे चौकशीदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विद्यार्थीनीची हत्या तेथील कामावर असलेल्या सुरक्षा रक्षकाने केल्याची बाब उघड झाली असून सुरक्षा रक्षक आपली छेड काढत असून जाता-येता त्रास देत असल्याची तक्रार पीडीत तरुणीने वसतिगृहाच्या वॉर्डनकडे केली परंतु, वॉर्डनने त्याची दखल न घेतल्यामुळे या तरुणीला जीव गमवावा लागला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी होत असून या घटनेची दखल राज्याच्या राज्य महिला आयोगाकडून घेण्यात आली आहे तसेच शासकीय वसतिगृहातील दोन अधीक्षिका व सुरक्षा रक्षक यांचेवर गुन्हे दाखल करणेबाबत सदर अत्याचारग्रस्त विद्यार्थिनीच्या कुटुंबातील लोकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलांबाची करणे काय ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, सदर घटना दिनांक ६/०६/२०२३ रोजी निदर्शनास आलेली आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) विद्यार्थीनीची हत्या झाल्याची बाब खरी आहे. तथापि, पिडीत विद्यार्थीनीने सुरक्षारक्षक छेड काढत असल्याची तक्रार वसतिगृह अधिक्षिकांकडे केलेली नाही.
(४) व (५) महिला आयोगाच्या प्रतिनिधींनी दिनांक ७/०६/२०२३ रोजी वसतिगृहास भेट देऊन घटनेची माहिती घेतली आहे.

प्रस्तुत घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने सदर घटनेची चौकशी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ८/०६/२०२३ अन्वये राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान, मुंबई व कुलगूरु, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांची व्दिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली.

त्याचबरोबर उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्यातील सर्व शासकीय वसतिगृहांची सुरक्षा तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ७/०६/२०२३ अन्वये संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली.

सावित्रीदेवी फुले महिला वसतिगृहाच्या अधिक्षीका यांना शासन आदेश दिनांक १६/०६/२०२३ अन्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच सर्व वसतिगृहांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वसतिगृहांच्या परिसरात अद्ययावत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याच्या निर्देशासह अन्य करावयाच्या उपाययोजनांबाबत शासन निर्णय दिनांक २८/०६/२०२३ अन्वये विस्तृत निर्देश देण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत घटनेसंदर्भात मरीन ड्राईव्ह, पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ११९/२०२३ भा.द.वि. च्या कलम ३०२, ३७६ (२)(ड) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्ह्यातील मृत्यू पावलेल्या आरोपी विरुध्द मा.न्यायालयात अंतिम अहवाल सादर करण्याची कार्यवाही पोलीसांकडून सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.